https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३४३ शुक्रवार दि.२१ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-343 Friday, Dt.21 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मराठी येत नसेल तर चालकांचा 'बॅज' होणार निलंबित..!

## एक महिन्याची संधी, नियम न पाळल्यास थेट तीन महिन्यांची कारवाई - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## व्यवहारिक मराठी न येणाऱ्या १,२६८ चालकांना नोटिसा, ३० सप्टेंबरपर्यंत राज्यभर तपासणी मोहीम

### ३० सप्टेंबरपर्यंत धडक तपासणी

राज्यातील ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. तपासणीदरम्यान चालकांना प्रवाशांशी दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या मराठी भाषेचे ज्ञान आहे की नाही, याची पडताळणी केली जाणार आहे.

मराठीचे ज्ञान अपुरे असल्याचे आढळल्यास संबंधित चालकाला सुधारणा करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली जाणार आहे. या कालावधीत मराठी भाषा आत्मसात न केल्यास त्याच्या बॅजवर तीन महिन्यांच्या निलंबनाची कारवाई केली जाणार आहे.

मुंबई /प्रतिनिधी

महाराष्ट्रात प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना आता व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने राज्यभर तपासणी मोहीम हाती घेतली असून, मराठीचे पुरेसे ज्ञान नसलेल्या चालकांना एक महिन्यात मराठी शिकण्याची संधी देण्यात येत आहे. त्यानंतरही नियमाचे पालन न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तब्बल तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. या निर्णयामुळे व्यावसायिक प्रवासी वाहतूक क्षेत्रातील चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.




### 'नियमांपेक्षा प्रवाशांची सोय आणि सुरक्षितता महत्त्वाची'...

महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी आणि सुरक्षिततेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, मुदत संपल्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.

त्यामुळे आता राज्यातील व्यावसायिक प्रवासी वाहनचालकांसमोर 'एक महिन्यात मराठी शिका, अन्यथा बॅज गमवा!' असे स्पष्ट आव्हान उभे ठाकले आहे.

राज्यात १,२६८ चालकांना नोटिसा

मुंबई महानगर क्षेत्रात परिवहन विभागाने केलेल्या तपासणीत तब्बल ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले. या सर्व चालकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

राज्यातील आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार ४,२२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आतापर्यंत एकूण १,२६८ चालकांना व्यवहारिक मराठी शिकण्याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

# जिल्हास्तरीय शेतकरी आत्महत्या समितीची बैठक संपन्न

बीड /प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय शेतकरी आत्महत्या समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत शेतकरी आत्महत्यांशी संबंधित प्रकरणांचा आढावा घेण्याबरोबरच पात्र कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




यावेळी जिल्ह्यात नोंद झालेल्या शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणांची विभागनिहाय माहिती घेण्यात आली. संबंधित प्रकरणांमध्ये शासनाच्या निकषांनुसार पात्रता तपासून पुढील कार्यवाही करण्याबाबत चर्चा झाली. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना उपलब्ध असलेल्या शासकीय मदतीचा लाभ वेळेत मिळतो की नाही, याचाही आढावा घेण्यात आला.

शेतकरी कुटुंबांना आर्थिक तसेच प्रशासकीय मदत मिळवून देताना संबंधित यंत्रणांनी संवेदनशीलतेने काम करावे, प्रकरणांची अनावश्यक विलंब न करता तपासणी पूर्ण करावी आणि पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा, यावर बैठकीत भर देण्यात आला.

शेतकऱ्यांच्या अडचणी, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, पीक नुकसान आणि आर्थिक संकट यांसारख्या बाबींचा विचार करून संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली. बैठकीला उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाशी संबंधित माहिती सादर केली.

# ग्रामसभा घेण्यास ग्रामसेवकांचा बहिष्कार

## जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली असेल तर घाबरण्याचे कारण काय - गायके राजू

बीड ।प्रतिनिधी

ग्रामसभा सचिव म्हणून ग्रामसभा घेण्यास ग्रामसेवकांनी बहिष्काराची भूमिका घेतली असेल, तर त्यामागे भ्रष्टाचाराचे कारण आहे का, असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गायके राजू यांनी उपस्थित केला आहे.



ग्रामसभा ही गावातील विकासकामे, शासकीय योजना व निधीच्या वापराबाबत पारदर्शकता ठेवणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. मात्र ग्रामसेवक ग्रामसभा घेण्यास तयार नसतील तर त्यामागचे कारण स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली.

जवळपास ९० टक्के गावांमध्ये ग्रामसेवकांच्या सहमतीने भ्रष्टाचार झालेला असल्याचा माझा अंदाज आहे. त्यामुळेच ग्रामसेवकांना ग्रामसभा घेण्याची भीती वाटत आहे, असा गंभीर आरोप गायके राजू यांनी केला.

ग्रामसेवकांनी प्रामाणिकपणे काम केले असेल तर ग्रामस्थांना सामोरे जाण्याची भीती कशाला? ग्रामसभा नियमित व पारदर्शकपणे घेऊन ग्रामस्थांच्या प्रश्नांना सामोरे जावे अन्यथा पदावर राहण्यापेक्षा राजीनामा द्यावा, असेही गायके राजू यांनी स्पष्ट केले.



# पवित्र पोर्टलवर उर्दू माध्यमाला न्याय

केंद्रप्रमुख पदोन्नतीबद्दल जितीन रहमान यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

पवित्र पोर्टलवर उर्दू माध्यमातील रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध केल्याबद्दल तसेच केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबविल्याबद्दल अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

उर्दू शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. भविष्यातही उर्दू माध्यमाच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली.

यावेळी केंद्रप्रमुख श्रीमती सलमा मॅडम, जिल्हाध्यक्ष काझी मुशाहेद अजिज, कार्याध्यक्ष उस्मान खान, तालुकाध्यक्ष मोमीन मोहम्मद खैसर व जिल्हा सहसचिव मोमीन जावेदमिया उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचा रुग्णांसाठी

## हेल्पलाईन क्रमांक जाहीर

बीड (जिमाका)

जिल्हाधिकारी कार्यालयातील तळ मजल्यावर असलेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गंभीर आजारांशी लढणाऱ्या गोरगरीब व गरजू रुग्णांना तातडीने आर्थिक मदत मिळवून देणे, हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सुविधेसाठी या कक्षाचा विशेष हेल्पलाईन क्रमांक ९६५७३५५११३ जारी करण्यात आला आहे.




या वैद्यकीय सहायता कक्षामुळे जिल्ह्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी लागणाऱ्या शासकीय योजनांची माहिती मिळणे आणि उपमुख्यमंत्र्यांच्या वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळणे अधिक सोपे होणार आहे. कोणत्याही वैद्यकीय मदतीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी नागरिकांनी या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5






संपादकीय....

# हेल्थ इज वेल्थ

दी लेडी बॉस-अर्चना सोंडे एखादी कल्पना नीटपणे अमलात आणली तर छोट्याशा गुंतवणुकीतूनही कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय उभा राहू शकतो. पंजाबच्या जालंधरची पलक मिधाची कहाणी याचाच जिवंत पुरावा आहे. अवघ्या ५ लाख रुपयांच्या गुंतवणुकीत सुरू झालेला 'पलक नोट्स' हा हेल्थ आणि वेट लॉस सप्लिमेंट्स ब्रँड आज दरमहा १५ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करणारा यशस्वी व्यवसाय ठरला आहे.पलक मिधा हिने जालंधरमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर रुरकी येथून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंगची पदवी घेतली. पुढे पुण्यातून एमबीए पूर्ण केले. कॉलेजमध्येच तिची ओळख परीक्षित यांच्याशी झाली. दोघांचे २०१० मध्ये लग्न झाले. पतीच्या नोकरीमुळे ती जर्मनीत स्थायिक झाली. जर्मनीमध्ये तिने अनेक नामांकित कंपन्यांमध्ये सेल्स इंजिनीअर आणि व्यवस्थापकीय पदांवर काम केले. मात्र, करिअर उत्तम सुरू असतानाच आवड निर्माण झाल्यामुळे ती आरोग्य आणि पोषणशास्त्राकडे वळली. तिने सप्लिमेंट्स आणि न्यूट्रिशनचे विशेष शिक्षण घेतले. ती प्रमाणित सल्लागार बनली. पलकने सर्वप्रथम आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या कुटुंबासाठी केला. तिच्या वडिलांना स्पॉन्डिलायटिसचा त्रास होता, तर आईला ऑटो-इम्यून थायरॉईडची समस्या होती. योग्य आहार, जीवनशैलीतील बदल आणि स्वतः विकसित केलेल्या सप्लिमेंट्समुळे दोघांच्या आरोग्यात मोठी सुधारणा झाली. वडिलांनी वयाच्या ५८व्या वर्षी नवीन व्यवसाय सुरू केला, तर आईची थायरॉईडची समस्या नियंत्रणात आली. लठ्ठपणाशी झुंज देणारा तिचा धाकटा भाऊ प्रणवही तब्बल ४० पाउंड वजन कमी करण्यात यशस्वी झाला. याच यशातून व्यवसायाची बीजे रोवली गेली.

२०१८ पासून पलकने फेसबुक, यूट्यूब आणि इन्स्टाग्रामवर आरोग्यविषयक माहिती देणारे व्हिडीओ तयार करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला ती ब्लॉग लिहायची. मात्र, लोक व्हिडीओ अधिक आवडीने पाहतात हे लक्षात आल्यानंतर तिने व्हिडीओ कंटेंटवर भर दिला. हळूहळू तिची लोकप्रियता वाढत गेली. आज पलकच्या फेसबुकवर १० लाखांहून अधिक फॉलोअर्स, 'पलक नोट्स' यूट्यूब चॅनलवर ५ लाखांहून अधिक सदस्य आहेत. 'ऋळीं थळींह झरश्ररज्ञ' या दुसऱ्या चॅनलवर हजारो फॉलोअर्स आहेत. हीच डिजिटल उपस्थिती तिच्या व्यवसायासाठी मोठी ताकद ठरली. नोव्हेंबर २०१९ मध्ये पलक आणि तिचा भाऊ प्रणव यांनी पलक स्टार्क प्रा.लि. 'झरश्ररज्ञ डींरीज्ञ झ्रीिं. डींव.' ची स्थापना केली. सुरुवातीला त्यांनी -ऊ३ (तळींराळप -, ऊ३ आणि घ२) सप्लिमेंट बाजारात आणले. विशेष म्हणजे पहिली उत्पादन बॅच ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच पूर्ण विकली गेली. यामुळे कंपनीला आत्मविश्वास मिळाला आणि उत्पादनांची संख्या वाढत गेली. आज कंपनीकडे ४५ हून अधिक हेल्थ सप्लिमेंट्स, स्वतःची वेबसाइट, अमेझॉन आणि फ्लिपकार्ट सारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर विक्रीस्थान आणि देशभरातील लाखो ग्राहक अशी मजबूत व्यवस्था उभी आहे.

प्रणव अमेरिकेतून एमबीए पूर्ण करून भारतात परतला आणि त्याने कंपनीच्या विस्ताराची जबाबदारी स्वीकारली. आज कंपनीत १७० कर्मचारी, शेकडो प्रशिक्षित आहारतज्ज्ञ, ग्राहकांसाठी मोफत मार्गदर्शन, उत्तम प्रशिक्षण प्रणाली अशी भक्कम यंत्रणा कार्यरत आहे. कंपनीचा दावा आहे की, त्यांनी ६० हजारांहून अधिक लोकांना वजन कमी करण्यास मदत केली आहे.

# शेकडो विद्यार्थ्यांना दिली यशाची दिशा-आदर्श मुख्याध्यापक श्री.सुनील तरटे सरांचा सेवापुर्ती गौरव सोहळा

'३७ वर्षांची आदर्श ज्ञानसेवा'

आष्टी : शिक्षण ही केवळ नोकरी नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणारे समाजघडणीचे कार्य आहे, या भावनेतून तब्बल ३७ वर्षे अविरतपणे शिक्षणसेवा बजावणारे धामणगाव येथील रहिवासी तथा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, धानोरा येथील आदर्श केंद्रीय मुख्याध्यापक श्री. सुनील पंडितराव तरटे सर हे नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्ताने त्यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळा शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी होत आहेत.

सन १९८९ मध्ये शिक्षक म्हणून सुरू झालेला त्यांचा शिक्षणसेवेचा प्रवास आता गौरवपूर्ण टप्प्यावर येऊन पोहोचला असून, त्यांच्या प्रदीर्घ सेवेला मानवंदना देण्यासाठी २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता धानोरा येथील मंगलमूर्ती मंगल कार्यालय, नगर-बीड रोड येथे सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री. सुनील पंडितराव तरटे सर यांनी आपल्या ३७ वर्षांच्या सेवाकाळात केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देण्याचे काम केले नाही, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, आत्मविश्वासाची निर्मिती, सुप्त गुणांना वाव, शैक्षणिक गुणवत्ता आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. शिक्षक, मुख्याध्यापक आणि सहकार क्षेत्रातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त, नियोजन, पारदर्शकता आणि समन्वय या मूल्यांना आपल्या कार्यपद्धतीचा आधार बनवले. त्यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या मनात त्यांनी एक आदर्श शिक्षक व कुशल प्रशासक म्हणून विशेष स्थान निर्माण केले.



श्री. सुनील पंडितराव तरटे यांचा जन्म ६ ऑगस्ट १९६८ रोजी धामणगाव येथे झाला. त्यांचे वडील मा. श्री. पंडितराव तरटे सर हे प्राथमिक शिक्षक होते, तर आई कै. यशोदाबाई तरटे या गृहिणी होत्या. आई-वडील तसेच आजी-आजोबांकडून मिळालेल्या संस्कारांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळाला. घरातील शैक्षणिक वातावरणामुळे शिक्षण क्षेत्राविषयीची आवड त्यांच्या मनात लहानपणापासूनच निर्माण झाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धामणगाव येथे, तर माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद हायस्कूल, धामणगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी भूम, जि. धाराशिव येथे डी.एड.चे शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षक म्हणून समाजसेवेचे क्षेत्र स्वीकारले.

सन १९८९ मध्ये प्राथमिक शाळा, सालेवडगाव, ता. आष्टी येथे शिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यानंतर मांडवा येथे त्यांनी सेवा बजावली. त्या काळात मांडवा येथील शाळेत केवळ चार शिक्षक होते आणि सातवीपर्यंतचे वर्ग होते. मात्र श्री. सुनील तरटे सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शाळेच्या विकासासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे शाळेची पटसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी शाळेतील शिक्षकसंख्याही दहा शिक्षकांपर्यंत पोहोचली. शाळेच्या विकासासाठी स्थानिक समाजाचा सहभाग, पालकांचा विश्वास आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देत त्यांनी केलेले काम त्या काळात विशेष ठरले.

मांडवा येथे कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या क्रीडा, सांस्कृतिक, बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत झाले. त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे ऑलिम्पिक धावपटू मा. श्री. अविनाश साबळे यांचा विशेष उल्लेख केला जातो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी क्षमता असते आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळवू शकतात, हा विश्वास त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केला.

सन २०१३ ते २०१८ या कालावधीत श्री. सुनील तरटे सर यांनी आष्टी नंबर १ शाळेत सेवा बजावली. त्यानंतर एक वर्ष त्यांनी केंद्रीय मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पार पाडली. पुढे सन २०१८ मध्ये शिरापूर येथे बदली झाल्यानंतर तेथेही त्यांनी गुणवत्तापूर्ण आणि प्रामाणिक सेवा बजावली. सन २०२३ मध्ये त्यांची धानोरा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्या केंद्रीय मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाली. धानोरा येथे मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच प्रशासकीय शिस्त, शिक्षकांमधील समन्वय, पालकांचा सहभाग आणि ग्रामस्थांचे सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले.

धानोरा केंद्रीय प्राथमिक शाळेच्या गुणवत्तावाढीत श्री. तरटे सर यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केली. श्री. तरटे सरांच्या कार्यकाळात धानोरा शाळेस मिशन जरेवाडी अंतर्गत सर्वोत्कृष्ट जिल्हा पुरस्कार मिळालेला आहे. तसेच यावर्षी चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शाळेतील तब्बल १९ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यापैकी ६ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. विद्यार्थ्यांची ही उल्लेखनीय कामगिरी शाळेतील शिक्षकांचे परिश्रम, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, पालकांचे सहकार्य आणि मुख्याध्यापक म्हणून श्री. तरटे सर यांच्या नियोजनबद्ध कार्याची साक्ष देणारी आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धात्मक युगात सक्षम बनवता यावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

शाळेच्या भौतिक विकासासाठीही त्यांनी लोकसहभागाला प्रोत्साहन दिले. शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांना सोबत घेऊन विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून गावाच्या विकासाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र असावे, या दृष्टिकोनातून त्यांनी शाळेच्या विकासाचे नियोजन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वय अधिक मजबूत झाला. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल विविध संस्थांनी घेतली. त्यांना रोटरी क्लबचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच बीड येथील राजमाता अहिल्याबाई होळकर आदर्श शिक्षक पुरस्कार अशा सन्मानांनी गौरविण्यात आले. हे पुरस्कार त्यांच्या अध्यापनातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाची पावती मानली जाते. विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणे, त्यांच्या क्षमतेला वाव देणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हेच शिक्षक म्हणून आपल्या कार्याचे खरे यश आहे, ही भूमिका त्यांनी सातत्याने जपली.

शिक्षणसेवेबरोबरच श्री. सुनील तरटे सर यांनी सहकार क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले. स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था, मर्यादित कडा, ता. आष्टी येथे सन २००० मध्ये त्यांची संचालकपदी निवड झाली. सन २००३ मध्ये त्यांनी संस्थेच्या सचिवपदाची जबाबदारी स्वीकारली. संचालक म्हणून सुमारे १७ वर्षे आणि सचिव म्हणून ९ वर्षे त्यांनी संस्थेच्या कामकाजात योगदान दिले. संस्थेच्या विकासासाठी शिस्त, पारदर्शकता आणि नियोजनाला महत्त्व देत त्यांनी सहकाऱ्यांचा विश्वास संपादन केला. शिक्षण क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग सहकार क्षेत्रातही प्रभावीपणे करत त्यांनी संस्थेच्या वाटचालीत आपला ठसा उमटविला.

श्री. तरटे सर यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही केवळ आपल्या पदापुरते काम मर्यादित ठेवले नाही. शिक्षक म्हणून अध्यापन, मुख्याध्यापक म्हणून प्रशासन आणि सहकार क्षेत्रातील जबाबदारी अशा विविध भूमिका त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांना प्रोत्साहन देणे, पालकांचा शाळेतील सहभाग वाढविणे आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळेचा विकास साधणे या सर्व बाबींमध्ये त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. त्यांच्या शांत आणि संयमी स्वभावामुळे अनेकांना ते मार्गदर्शक म्हणून लाभले.

त्यांच्या कुटुंबातही शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील सेवाभावाची परंपरा पुढे सुरू आहे. त्यांचे पुत्र डॉ. सागर तरटे आणि डॉ. तुषार तरटे हे दोघेही वैद्यकीय अधिकारी असून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या सून डॉ. सुचारिता तरटे, आरोग्य अधिकारी म्हणून आरोग्य क्षेत्रात सेवा बजावत आहेत. त्यांच्या पत्नी सौ. गंगा सुनील तरटे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कडा येथे आदर्श शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे शिक्षण आणि आरोग्य या समाजाच्या मूलभूत क्षेत्रांमध्ये तरटे कुटुंबाचे योगदान सुरू आहे.

आता ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर श्री. सुनील पंडितराव तरटे सर यांच्या सेवानिवृत्तीचा गौरव सोहळा धानोरा येथे होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. सविताताई सुभाष शेळके, सरपंच, धानोरा राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. अंकुशराव चव्हाण, माजी सभापती, पंचायत समिती आष्टी, मा. श्री. परमेश्वर काका शेळके, माजी पंचायत समिती सदस्य, आष्टी, श्री. नामदेव (मामा) शेळके, सामाजिक कार्यकर्ते, मा. श्री. संजय नाना गाढवे, माजी चेअरमन, दूध संघ, आष्टी, प्रा. डॉ. हरिदास विघाते सर, आनंदराव धोंडे तथा बाबाजी महाविद्यालय, कडा तसेच श्री. सुरेश पवार सर, माजी अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कडा यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. रविंद्र महामुनी साहेब, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती आष्टी, सौ. सिमा काळे मॅडम, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, मा. जावेद पठाण साहेब, केंद्रप्रमुख, श्री. मारुती पठाडे, अध्यक्ष, श्री. अशोक लटपटे, उपाध्यक्ष, श्री. महेशकुमार शिंदे, सचिव, तसेच स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या., कडा यांचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे.

या सेवापूर्ती सोहळ्यात श्री. सुनील तरटे सर यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचा, शाळेच्या विकासातील योगदानाचा आणि शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधत केलेल्या सेवाभावी कार्याचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. या सोहळ्यास आष्टी तालुक्यातील आजी-माजी शिक्षण विस्तार अधिकारी, आजी-माजी केंद्रप्रमुख, आजी-माजी मुख्याध्यापक, आजी-माजी संचालक, शिक्षक-शिक्षिका, माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी, धानोरा परिसरातील नागरिक आणि श्री. तरटे सरांचे हितचिंतक उपस्थित राहून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देणार आहेत.

तब्बल ३७ वर्षांच्या काळात अनेक पिढ्यांना ज्ञानाचे धडे देताना श्री. सुनील पंडितराव तरटे सर यांनी शेकडो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली. त्यांच्या हातून घडलेले विद्यार्थी हेच त्यांच्या कार्याचे खरे वैशिष्ट्ये ठरणार आहेत. त्यांनी उभारलेली शैक्षणिक गुणवत्ता, निर्माण केलेली विश्वासाची नाती, शाळेच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आणि सहकार क्षेत्रातील योगदान त्यांच्या सेवापर्वाची कायमस्वरूपी ओळख राहणार आहे. सेवानिवृत्ती हा त्यांच्या कार्याचा शेवट नसून एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. शिक्षणसेवेत त्यांनी प्रज्वलित केलेली ज्ञानाची ज्योत त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वातून पुढेही तेवत राहील. शिक्षणसेवेला जीवनाचे ध्येय मानून ३७ वर्षे निष्ठेने कार्य करणारे आदर्श केंद्रीय मुख्याध्यापक श्री. सुनील पंडितराव तरटे सर यांच्या कार्याला मनःपूर्वक सलाम आणि सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**शब्दांकन...**
**राजेंद्र लाड,आष्टी (९४२३१७०८८५)**


**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर २रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६३२/२०२६**
**आशाबाई विरूध्द - निरंक**
**(मार्फत -ॲड. ए.एस. पंडित )**

ज्याअर्थी मयत नामे गंगुबाई भ्र. बापुराव शेळके हे/या दिनांक ०७.०७.२०२६ रोजी मौजे दैठण ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झालेल्या आहेत.
अर्जदार
१.आशाबाई पि. राधाकिसन शेळके
वय ४६ वर्षे धंदा - शेती रा.दैठण, ता. गेवराई जि. बीड
शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे गंगुबाई भ्र. बापुराव शेळके रा. दैठण ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : २९.०९.२०२६

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**
**शिक्का**
**आदेशावरून**
**स.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर,गेवराई**



**टि सी हरवली आहे**
रामसिंग दत्तूसिंग परदेशी रा.पाथरवाला बुद्रुक ता.अंबड जि.जालना जिल्हा परिषद प्रशाला गोंदी ता.अंबड जि.जालना या नावाची इय्यता १० पास ची टी सी अंबड ते गोंदी प्रवासादरम्यान हरवली आहे कोणास सापडल्यास ९८५०४९९४३८ या क्रमांकावर संपर्क साधावा.



**जाहीरनामा / जाहीर प्रगटन**
**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती पी.व्ही.चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज, यांच्या न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३३१/२०२६**
**नि.क्र.ड**
**त्रिवेणीबाई पवार व इतर विरुध्द निरंक**
ज्यापेक्षा मयत नवनाथ सखाराम पवार हे दिनांक १८ माहे ०७ सन २०२६ हे साबळेश्वर ता. अंबाजोगाई. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि अर्जदार यांनी हया कोर्टास सदरह यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ धायगुडे ए. व्ही. यांचे मार्फत दाखल केला आहे.
अर्जदार
१) त्रिवेणीबाई भ्र. सखाराम पवार वय ८९ वर्षे, धंदा निरंक रा. सावळेश्वर ता. केज जि. बीड २) ज्योती भ्र. श्रीराम गायकवाड वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. जवळबन ता. केज जि. बीड ३) स्वाती भ्र. राजाभाऊ शिनगारे वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा. आवसगाव ता. केज जि. बीड ४) दिपाली भ्र. आकाश मस्के वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनूर ता. जि. बीड ५) अभिजित पि. नवनाथ पवार वय २९ वर्षे, धंदा शेती रा. सावळेश्वर ता. केज जि. बीड
त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहु मयत नवनाथ सखाराम पवार यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.
आज ११ वा महिना ०८ वर्ष २०२६ आहे.
प्रकरणाची पु.ता. २३/०९/२०२६

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**
**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**स. अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज**


# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी २४ वर्षीय तरुण अटकेत

## अंबाजोगाई शहर पोलिसांची कारवाई

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील मोची गल्ली परिसरात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी २४ वर्षीय तरुणास अटक केली आहे. रीतीक देवदत्त चौधरी (वय २४, रा. मोची गल्ली, अंबाजोगाई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी एका हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगाराची असून, दि. १८ ऑगस्ट रोजी रात्री आरोपीने तिला मोबाईलवरून संपर्क साधून बोलावून घेतले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पीडित मुलीच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३३५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह पोक्सो कायद्यान्वये कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास करण्यासाठी हा गुन्हा पिंक पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेंडगे यांनी तपासाची सूत्रे हाती घेत आरोपी रीतीक चौधरी यास अटक केली. आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, आरोपीविरुद्ध यापूर्वीही भांडणासह अन्य स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांकडून मिळत असून, परिसरात त्याच्याविषयी दहशतीचे वातावरण असल्याचे सांगितले जात आहे. मोची गल्ली परिसरात काही टवाळखोर तरुणांकडून नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारीही स्थानिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत. त्यामुळे या परिसरात पोलिसांनी अधिक प्रभावी गस्त वाढवून अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११७७ दि.११.०८.२०२६
**जाहिर प्रगटन**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**
अर्जदार **गणेश बाबुलाल पवार, रा.कर्जत ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सृष्टी गणेश पवार | मुलगी | १३.१०.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ११/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.
**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२१६ दि.१८.०८.२०२६
**जाहिर प्रगटन**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**
अर्जदार **विकास संतोष राठोड, रा.वडीकाळ्या तांडा, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिध्दार्थ विकास राठोड | मुलगा | ०९.११.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.
**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# मोल मातीचे पाण्यासोबतच माती वाचवा!

बीड - पाणी आणि माती वाचविण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. यात पाण्याइतकंच महत्व मातीला आहे. सुपीक माती तयार होण्याची प्रक्रिया आपण जाणून घेतल्यास कळेल की माती वाचवणे का आवश्यक आहे आणि माती वाचविण्याचे फायदे कोणते आहे.

माती तयार होण्याची प्रक्रिया अतिशय मंद स्वरुपाची असून मोठ्या खडकांच्या उन, वारा, पाऊस यांच्या सततच्या संपर्काने खडकाचे विघटन होत असते प्रत्यक्ष खडक मातीत रुपांतरीत होण्यास हजारो वर्षे लागतात. खडक मातीत रुपांतरीत होण्यास हजारो वर्षे लागतात. आपण शेतात जी माती बघतो ती याच प्रक्रियेतून तयार झालेली असते आणि खडकांमधील सर्व मुलद्रव्ये त्यात असतात आणि त्याच्या गुणवत्तेनुसार मातीचा रंग, कस आणि गुणवत्ता ठरते.

खडकांची झीज मातीची सुरुवात असते. खडक दिवसा उन्हामुळे तापतात आणि प्रसरण पावतात आणि रात्री तापमान कमी झाल्यानंतर ते पुन्हा आकुंचन पावतात त्यामुळे खडकांना तडे जाण्याची प्रक्रिया होते. या प्रक्रियेत पावसाचे पाणी जमा झाल्यास याची गती वाढते आणि खडक ठिसुळ होतात त्यानंतर त्याचे विघटन होत माती होण्याची प्रक्रिया अधिक गतीने होत असते.पाण्याने खडक फुटल्यानंतर माती तयार होताना त्या खडकावर जमलेले शैवालजन्य जीवसृष्टीतील घटक ज्यात सुक्ष्मजीव असतात ते हळूहळू खडकाचं रुपांतर मातीत करतात.या सर्व प्रक्रियेदरम्यान मृत वनस्पती आणि प्राणि कुजल्यामुळे काळा सेंद्रीय पदार्थ तयार हो तो याचा हयुम्स म्हणतात या ह्युम्समुळे माती सूपीक बनते.

रंग व प्रकार

आपल्या राज्यात आणि देशभरात विविध प्रकारच्या खडकांची उपलब्धता आहे. आणि या खडकांच्या आणि त्यातील खनिजांच्या प्रमाणावर मातीचे प्रकार आणि वेगवेगळे रंग आपणास दिसतात आणि यात असणाऱ्या खनिज पदार्थांवर याच्या सुपीकतेमध्ये ही तितकेच वेगळे प्रकार दिसतात.

गडद काळा किंवा फिका काळा रंग असणारी माती टायटॅनिफरस मॅग्नाईट या खनिजामुळे प्राप्त होतो. महाराष्ट्रात मुख्यत्वे करुन ज्वालामुखीजन्य खडक अर्थात बेसाल्ट खडक असल्याने राज्यात या प्रकारची माती अधिक आहे. या प्रकारची माती कापूस आणि ऊस उ त्पादनासाठी सकस मानली जाते.

तांबडी किंवा लाल रंगाची माती खडकांमध्ये असणाऱ्या लोह अर्थात आयर्न ऑक्साईडमुळे तयार होते. या लोहामुळेच मातीचा रंग हा लाल होतो. लाल रंगाची माती ग्रॅनाईट आणि नीस या खडकांच्या विघटनातून तयार होवे कोकणचा काही भाग आणि पूर्व विदर्भात या स्वरुपाची माती आपणास दिसते.

जांभी माती ही विटांसारखी गडद लाल आणि जांभा रंग असल्याने त्याला वेगळी ओळख आहे. अतिपावसाच्या भागांमध्ये




खडक आणि माती यातील लोह आणि ल्युमिनियम वगळता इतर सर्व प्रकारची खनिजे वाहुन जातात त्यामुळे या मातीचा रंग गडद लाल असते राज्यात तळकोकण अर्थात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे आणि लगतचा गोवा राज्याचा प्रदेश या ठिकाणी अशी माती आढळते. काजू, आंबा आणि चहाच्या शेतीसाठी ही माती अतिशय उत्तम मानली जाते.

गाळाची माती ही देशातील सर्वाधिक सूपीक माती आहे. नद्या पावसाच्या पाण्यासोबत विविध प्रकारचे सेंद्रीय पदार्थ आणि खनिजे वाहून आणतात. यामुळे या मातीचा रंग राखाडी (ग्रे) किंवा पीवळसर असतो.

या खेरीज डोंगर उतारावर पावसाचे पाणी वाहून पठाराकडे जाते त्यामुळे डोंगरावरील मातीमधील पाण्याचे प्रमाण वाढल्याने होणाऱ्या प्रक्रियेमुळे तिचा रंग पिवळसर होतो. तुलनेत याची सुपीकता कमी असते.

आता मातीचे रंग आणि प्रकार यानुसार शेती होते मात्र पावसाचे प्रमाण वाढल्यास पाण्यासोबत माती वाहुन जाते. ती वाहून गेल्यास जमिनीचा कस कमी होतो. आणि याचा परिणाम शेतीतील उत्पन्नावर होतो. जितकी आर्थिक माती वाहून जाईल तितका सकसपणा कमी होवून अपेक्षित प्रमाणात उत्पादन होत नाही. परिणामी उत्पन्न देखील कमी होते त्यामुळे माती वाहून जाणे अर्थात मृद संधारण आवश्यक ठरते.

वृक्षांची मुळे माती धरुन ठेवत असतात अशा ठिकाणी माती वाहुन जाण्याचे प्रमाण अत्यंत कमी असते त्यामुळे वृक्षारोपण हा मृदसंधारणाचा महत्वाचा भाग ठरतो. जितके वृक्षाच्छादन अधिक तितका मातीचा ऱ्हास कमी सोबत वृक्ष पावसाचे पाणी जमिनीत मुरवत असतात त्यामुळे मृदसंधारणासोबतच जलसंधारणाचेही काम होत असते.माती आणि पाणी आपल्या जीवनाचा आधार आहेत त्यामुळे आपण दोन्हीसाठी प्रयत्न करण्याची गरत आहे. राज्यात केवळ १६.५ टक्के क्षेत्र वनाखाली आहे. ते राष्ट्रीय निर्देशांकानुसार किमान ३३ टक्के असायला हवे. यातही सर्वाधिक वृक्षाच्छादन गडचिरोली, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात आहे. लातूर जिल्हा ०.१८ टक्के, सोलापूर जिल्हा ०.३३ टक्के आणि जालना जिल्ह्यात केवळ ०.४७ टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन आहे. ज्या ज्या जिल्ह्यात झाडांची संख्या कमी त्या जिल्ह्यात पावसाचे प्रमाण देखील कमी राहते. परिणामी या भागात सातत्याने दुष्काळी स्थिती दिसते.

सिंचनातून शेतीला असणाऱ्या मर्यादा लक्षात घेता राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यासोबतच माथा ते पायथा पाणलोटाचा विकास आणि इतर उपाय करुन पाणी वाचवायला पाहिजे. आगामी पिढ्यांना संपन्न असं राज्य द्यायचं असेल तर आजच सुरुवात करु जलसंवर्धनाचा संकल्प करु.

शब्दांकन....

**प्रशांत दैठणकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
९८२३१९९४६६

## गेवराई शहरात टिपरी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**विविध वेशभूषांमध्ये कलाकारांनी सादर केले टिपरीचे खेळ; रेड्यावर बसलेला 'यम' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू**

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरात गेल्या अनेक दशकांपासून पारंपरिक टिपरी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदाही शहरातील विविध चौक, गल्ली आणि परिसरांमध्ये टिपरीचे विविध प्रकार सादर करण्यात आले. विविध वेशभूषा परिधान करून कलाकारांनी सादर केलेल्या टिपरीच्या खेळांनी नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या महोत्सवातील विशेष आकर्षण ठरले ते शिवाजीनगर परिसरातील रेड्यावर बसलेला 'यम'. यामुळे टिपरी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.शिवाजीनगर येथील रोहित रामभाऊ हदगुले यांनी रेड्याची भूमिका साकारत टिपरी महोत्सवात




सहभाग घेतला. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.पारंपरिक संस्कृती आणि लोककलेची जपणूक करणाऱ्या या टिपरी महोत्सवामुळे गेवराई शहरातील उत्साहाला चांगलाच उधाण आले होते.

## स्टेप बाय स्टेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात विविध स्पर्धा परीक्षेतील ५५ गुणवंताचा सत्कार

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील स्टेप बाय स्टेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात राज्यस्तरीय चढड जळगाव परीक्षेत गुणवंत ठरलेल्या श्लोक महेंद्र कोल्हे, रुद्राणी परमेश्वर दुड्डे ,आर्यन गणेश काशीद, श्लोक संजय लोखंडे,यशवंत मुकुंद डोणे, रिशिता शिवाजी शिंदे, संस्कार सुरेश रोकडे , यज्ञेश सुरेशचंद्र नेळगे या विद्यार्थ्यांचा कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संतोष ढेरे व प्रमुख पाहुणे श्री सिद्धेश्वर विद्यालयातील संस्कृताचार्य ह भ प श्री आदिनाथशास्त्री कुंडकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला . तसेच राज्यस्तरीय ख-ड श्रेया इंटेलिजंट अकॅडमी सर्च परीक्षेतील विद्यार्थी मेघराज रामप्रसाद आळसे ,सुजाता सूर्यकांत शिंदे ,श्लोक महेंद्र कोल्हे, श्लोक संजय लोखंडे ,रुद्राणी परमेश्वर दुड्डे, आर्यन गणेश काशीद, अथर्व विष्णू लांडे ,स्वप्निल गणेश नाईकनवरे ,सार्थक विनायक चौरे, संस्कार सुरेश रोकडे ,प्रतीक प्रदीप कुलकर्णी या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला तर धनश्री अशोक डाके,आदिती श्रीकृष्ण शिंदे,सचिन सिद्धार्थ वाघमारे, सतेज सुशांत शेंडगे ,प्रभास गौतम बादाडे, संस्कार संदीप मोरे ,श्री गजानन खामकर, साहिल अमोल साळवे ,पवित्रा राजू चिगुरे, प्रांजल बालाजी मोरे, योगेश्वरी दत्ता मानकर, शिवगामी धैर्यशील सोळंके, मधुरा लक्ष्मण भंडारे ,स्वरागिनी सोपान वाघमारे, विश्वजा रामेश्वर शेजुळ, पूर्वी विलास इचके ,आर्वी विलास इचके, क्रांती दत्ता उंबरे,वेद भागवत अंबुरे, देवांश गणेश क्षत्रीय, दक्ष सिद्धार्थ सोनपसारे, समर्थ सुरेश चिगुरे, अभिजीत अशोक चिगुरे, अर्णव गणेश काळे, वेदवीर विजयकुमार सोन्नर, धनराज गोरख शिंदे, समर्थ गोरख मेंडके, विराज विजय पवार, सार्थक विनायक चौरे, पृथ्वीराज विजय सोळंके, सौरभ गजानन खामकर, युवराज राहुल मोटेगावकर, अमृत विलास बनसोडे या पात्र विद्यार्थ्यांचा




प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला .या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या संचालिका सुवर्णा रोकडे व अश्विनी फुलझळके यांचे मार्गदर्शन लाभले

प्रमुख पाहुणे श्री आदिनाथशास्त्री कुंडकर यांनी विद्यार्थ्यांना पाल्याच्या जडणघडणीत असलेले आई-वडिलांचे स्थान व शालेय स्पर्धा परीक्षेबरोबरच आध्यात्मिक विचाराचे महत्त्व पटवून दिले . संतोष ढेरे यांनी अध्यक्ष समारोपात स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धा परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या .यावेळी व्यासपीठावर संस्कृत पंडित प्राध्यापक नवनाथ आगे

## महाराष्ट्राच्या पशुवैभवाला राष्ट्रीय मान्यता..!


मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण 'उमरडा' गाईला स्वतंत्र देशी गोवंश, तर 'माडग्याळ' मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. त्यामुळे या दोन्ही स्थानिक पशुधनाच्या संवर्धन, जतन आणि आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या प्रस्तावानंतर भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल येथे नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली. ७ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटीच्या १४ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. ब्यूरोचे संचालक डॉ. एन.एच. मोहन यांनी अधिकृत पत्र जारी केले.

पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटकातील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांनी प्रस्तावासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी





तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी याबाबत माहिती दिली.

पशुपालकांसाठी अभिमानाची बाब : पंकजा मुंडे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, उमरडा गोवंश व माडग्याळ मेंढीला मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही महाराष्ट्राच्या पशुपालकांसाठी अभिमानाची बाब आहे. यामुळे पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक व शास्त्रीय बळ मिळून पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

डॉ. रामास्वामी एन. यांनी या मान्यतेमुळे स्थानिक प्रजातींच्या शास्त्रीय संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणेसाठी व्यापक संधी उपलब्ध झाल्याचे सांगितले.

पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी राष्ट्रीय ओळखीमुळे उमरडा व माडग्याळच्या जतन, सुधारित प्रजननासाठी सरकारी योजना व निधीचा मार्ग मोकळा होणार असून, याचा स्थानिक पशुपालकांना मोठा फायदा होईल, असे स्पष्ट केले.

उमरडा व माडग्याळची वैशिष्ट्ये

उमरडा गोवंश प्रामुख्याने यवतमाळ, अमरावती व वाशीम जिल्ह्यांत आढळतो. उंचपुरी अंगकाठी व पांढरा शुभ्र रंग ही त्याची वैशिष्ट्ये असून, बंजारा समाजासह स्थानिक पशुपालक पारंपरिक पद्धतीने त्याचे संगोपन करतात.

माडग्याळ मेंढी प्रामुख्याने धनगर व रामोशी समाजातील मेंढपाळ पाळतात. प्रतिकूल हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता, रोगप्रतिकारशक्ती, जलद वजनवाढ, चांगली मातृत्व प्रवृत्ती आणि मटण उत्पादनासाठी उपयुक्त गुणांमुळे या प्रजातीला मोठी मागणी आहे.

शब्दांकन....

- नंदकुमार वाघमारे/विसंअ

## जिद्द अन् चिकाटीच्या जोरावर यश निश्चित मिळते
## मी ही जि.प. शाळेचाच विद्यार्थी! - केजचे पी.आय. राहुल सूर्यतळ

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरपगाव येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस निरीक्षक सूर्यतळ यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

केज/प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,वरपगाव येथे केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (पी.आय.) श्री.राहुल सूर्यतळ यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी,जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण आयुष्यात कोणतेही यश प्राप्त करू शकतो. अपयश ही यशाची पहिली पायरी असते, त्यामुळे अपयश आले तरी खचून न जाता जिद्दीने उभे राहून यशाच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे, असा मोलाचा सल्ला दिला.पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून त्याचा सतत पाठलाग करण्याचे आवाहन केले.मीसुद्धा जिल्हा परिषदेचाच विद्यार्थी आहे.गुणवत्ता पूर्ण आणि सर्वांगीण विकास साध्य करायचा असेल,तर तो जिल्हापरिषद शाळेतच उत्तम प्रकारे होतो, असा सार्थ अभिमान त्यांनी यावेळी व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर होते,तर प्रमुख पाहुण्या म्हणून गावच्या प्रथम नागरिक सरपंच श्रीमती अमृता कांबळे उपस्थित होत्या याप्रसंगी पोलीस पाटील श्री.अरुण गालफाडे,सामाजिक कार्यकर्त्या उर्मिलाताई गालफाडे,सर्व



पालक वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर लेझीम,संगीत कवायत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच काहीविद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पाटील यु.डी,सहशिक्षक शिंदे ए.ए,घुले एस.व्ही, एकशिंगे जी.सी व शामल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. पी.आय.सूर्यतळ यांच्या या भेटीमुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये उत्साह निर्माण झाला होता.



## 'माझी शाळा, सुंदर शाळा' उपक्रमात स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिरचा महाराष्ट्रात तृतीय क्रमांक

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई : महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील शाळांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे, विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे तसेच शाळांमधील पायाभूत सुविधा, स्वच्छता, शिस्त आणि विविध गुणवत्तापूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी 'माझी शाळा, सुंदर शाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात आला.

या राज्यस्तरीय उपक्रमात अंबाजोगाई येथील स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिरने सहभाग नोंदवत संपूर्ण महाराष्ट्रातून तृतीय क्रमांकाचे मानाचे पारितोषिक पटकावले. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.शाळेचे हे यश संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. संतोषदादा कुलकर्णी यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील सकारात्मक दृष्टिकोन, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबतच्या दूरदृष्टीचे फलित मानले जात आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने घेतलेले प्रयत्न शाळेच्या प्रगतीला दिशा देणारे ठरले आहेत.

तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका तथा संस्थेच्या सचिव श्रीमती स्वरूपाताई दिग्रसकर यांच्या कुशल नेतृत्वाचे आणि प्रभावी नियोजनाचे या यशात महत्त्वपूर्ण योगदान आहे. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शाळेतील शिस्त, स्वच्छता, विविध उपक्रम आणि पायाभूत सुविधांकडे त्यांनी सातत्याने दिलेले लक्ष त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची आणि शिक्षणाविषयीच्या समर्पित दृष्टिकोनाची प्रचिती देणारे आहे.

या यशासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी घेतलेली मेहनत, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पालकांनी दिलेले सातत्यपूर्ण सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले. शाळेतील प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडल्यामुळेच हे राज्यस्तरीय यश शक्य झाले आहे.

'माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमातील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक म्हणजे स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिरच्या गुणवत्तापूर्ण आणि सातत्यपूर्ण वाटचालीला मिळालेली राज्यस्तरीय पावतीच आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. संतोषदादा कुलकर्णी, मुख्याध्यापिका तथा संस्थेच्या सचिव श्रीमती स्वरूपाताई दिग्रसकर, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# डॉ.विश्वनाथराव कराड बी.एड.कॉलेज केज येथे एक दिवसीय छात्र सेवाकाल व सराव पाठ कार्यशाळा संपन्न

केज ।प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर संलग्नित प्रा.डॉ.विश्वनाथराव कराड बी.एड.कॉलेज आणि संत भगवान बाबा एम.एड कॉलेज,केज यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ मधील बी.एड.व एम.एड.प्रशिक्षणार्थींसाठी एक दिवसीय छात्रसेवाकाल व सराव पाठ कार्यशाळा दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात अत्यंत उत्साहात संपन्न झाली.भावी शिक्षकांना शालेय अध्यापनातील प्रत्यक्ष कौशल्ये,वर्ग व्यवस्थापन,सराव पाठांचे नियोजन, विविध अध्यापन पद्धती,शैक्षणिक साधनांचा नाविन्यपूर्ण वापर आणि शालेय प्रशासकीय कामकाजाची परिपूर्ण माहिति मिळावी,या उद्देशाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.याकार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.माने मीनाक्षी मॅडम या होत्या.तर प्रमुख पाहुणे म्हणून संत भगवान बाबा एम.एड कॉलेजचे प्राचार्य डॉ. गायकवाड जी.सी,डॉ. कांबळे ए.एम आणि प्रा.माने बी.जी उपस्थित होते.तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.दशवंत व्ही. एम,प्रा.शिंदे व्ही.एस व प्रा.प्रसाद महाजन सर मंचावर उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे शब्द सुमनांनी यथोचित स्वागत व सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन छात्र अध्यापिकेने अत्यंत नेटके व प्रभावीपणे केले.कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात छात्र सेवाकाल नियोजन या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.यामध्ये छात्र सेवाकालाची उद्दिष्टे, नियमावली,दैनंदिन नोंदवही (डेस इेज्ञ) लेखन,शालेय आंतर क्रिया,सहशालेय उपक्रम आयोजन व प्रशासकीय नोंदी याविषयी सविस्तर तांत्रिक माहिति देण्यात आली.त्यानंतर अध्यक्षीय समारोपा पूर्वी प्रा.प्रसाद महाजन सर यांनी सराव पाठ व छात्र सेवाकाल या विषयावर सविस्तर असे विवेचन केले. यामध्ये त्यांनी सराव पाठ घटक नियोजन, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्याचा वापर, प्रभावी वर्गअध्यापनाचे प्रत्यक्ष तंत्र तसेच शालेय आंतरक्रिया बाबत प्रशिक्षणार्थींना सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या प्रसंगी इतर तज्ज्ञ मार्गदर्शकांनीही विद्यार्थ्यांची वैयक्तिक भिन्नता ओळखून अध्यापन करणे, सकारात्मक वर्ग नियंत्रण व आधुनिक मूल्यमापन पद्धती याविषयी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.माने मीनाक्षी मॅडम यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना सांगितले की,शिक्षक हा देशाच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार आहे.छात्रसेवाकाल हा शिक्षकी पेशाचा खरा पाया असून प्रत्येकाने आत्मविश्वासाने,निष्ठेने आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन दर्जेदार व आदर्श अध्यापन करावे. कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयकांनी उपस्थित सर्व मान्यवर, मार्गदर्शक,प्राध्यापक वृंद,शिक्षकेतरकर्मचारी व प्रशिक्षणार्थींचे मनःपूर्वक आभार मानले.राष्ट्रगीताने या कार्यशाळेची यशस्वी सांगता झाली.

---

### ३० ऑगष्ट रोजी केज शहरात येणाऱ्या जोगवा यात्रेला

# मोठ्या संख्येने उपस्थित राहुन सहकार्य करावे - श्रीनिवास केजकर

केज/प्रतिनिधी

सद्गुरु मकरंद महाराज दत्तधाम परभणी ते कुलस्वामिनी तुळजाभवानी जोगवा यात्रा संपूर्ण राज्यभर जोगवा मागून श्री क्षेत्र तुळजापूर येथे १००८ गुरुचरित्र पारायण व होम हवन व प्रसादाचे आयोजन केले आहे. केज तालुक्यात ही जोगवा यात्रा दि.३० ऑगस्ट रोजी येत आहे.धारूर कडून ही जोगवा यात्रा येऊन बालाजी मंदिर व वकीलवाडी हनुमान मंदिर येथे थांबेल या ठिकाणी ज्यांना जे दान करायचे असेल ते स्वच्छेने करावे.केज तालुक्यातून गोडेतेल डब्बे द्यायचे आहेत ज्यांना इच्छा असेल त्यांनी श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे,श्रीराम शेटे, श्रीधर खोत यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.सकाळी ११ वाजता बालाजी मंदिर येथे ही जोगवा यात्रा येईल व १२-३० वाजता वकीलवाडी हनुमान मंदिर येथे येईल.

जोगवा देताना उपयोगात येईल अश्या वस्तू द्याव्यात

गोडेतेल, गहू,तांदूळ,डाळी आदी सिद्याचे साहित्य द्यावे. ज्यांना रोख रक्कम द्यायची असेल त्यांनी रोख द्यावेत असे आवाहन धनंजय कुलकर्णी,श्रीनिवास केजकर,श्रीराम शेटे, शिवराज मुथळे,श्रीधर खोत,चंद्रकांत पाटील, मनीष जाजू,संदीप भूतडा,सचिन भूतडा, समीर देशपांडे यांच्या सह तुळजापूर देवी भक्तांनी सढळ हातांनी दान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# परळीत जिम ट्रेनर तरुणीची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या


बीड: परळी शहरातील इंदिरानगर परिसरात एका २३ वर्षीय जिम ट्रेनर तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. तुलसी संजय कमळु असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव असून, या तरुण आणि होतकरू तरुणीने टोकाचे पाऊल उचलल्याने परळी शहरात आणि संपूर्ण परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

नेमकी घटना काय?

तुलसी परळी शहरातील एका जिममध्ये ट्रेनर म्हणून कार्यरत होती आणि परिसरात ती अत्यंत मनमिळाऊ व परिचित होती. गुरुवारी (२० ऑगस्ट) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. घटनेच्या वेळी तिचे कुटुंबीय बाहेरगावी गेले असल्यामुळे ती घरी एकटीच होती. याच एकांतात तिने राहत्या घरी ओढणीच्या साहाय्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली.

पोलिसांकडून तपास सुरू

घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. याप्रकरणी नातेवाईकांनी दिलेल्या माहितीवरून संभाजीनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तुलसीने इतके टोकाचे पाऊल का उचलले, याबाबतचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. या प्रकरणाचा सखोल तपास फौजदार चव्हाण यांच्याकडून केला जात असून, पोलिसांकडून सर्व बाजूंनी कसून चौकशी सुरू आहे.



---

### शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी व्यापक बैठकीचे

# क्रांतिकारी शेतकरी संघटना,व शेतकरी संघटनेच्या वतीने रविवारी केज येथे आयोजन

केज /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर बीड जिल्हा क्रांतिकारी शेतकरी संघटना व शेतकरी संघटना बीड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने महत्त्वाची व्यापक बैठक रविवार दि.२३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजता केज येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित केली असून या बैठकीत शेतकऱ्यांची विनाअट सरसकट कर्जमुक्ती, नवीन पीककर्ज वाटप, थकीत पीक विमा,बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना पश्चिम महाराष्ट्र ,तामिळनाडू , उत्तरप्रदेश,गुजरात, कर्नाटकच्या धर्तीवर रास्त भाव मिळवणे, सोयाबीन,कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर, शेतमालाला रास्त भाव व इतर हक्कांच्या न्याय मागणीसाठी आगामी चळवळीची दिशा ठरवण्यात येणार आहे.या बैठकीला शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष मा. कालिदास आपेट व शेतकरी नेते जगदीश फरताडे,जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे हे मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीला जिल्ह्यातील सर्व शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक श्री.कुलदीप करपे जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना,बीड जिल्हा, निमंत्रक डॉ. आजिमोद्दिन शेख जिल्हाध्यक्ष (शेतकरी संघटना बीड), श्री.रामेश्वर गाडे युवा आघाडी अध्यक्ष, शेतकरी संघटना, गेवराई श्री.दिलीप लोंढे तालुकाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना केज तालुका, श्री.अतुल गवळी युवा तालुकाध्यक्ष केज, श्री.फेरोजभाई पठाण शहराध्यक्ष,क्रांतिकारी शेतकरी संघटना केज श्री.अनुरथ काशीद, शेतकरी संघटना धारूर,श्री.राधाकिशन गडदे शेतकरी संघटना अंबाजोगाई,श्री. महादेव गायकवाड,



शेतकरी संघटना माजलगाव,श्री. अभिजित लोमटे शहराध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना अंबाजोगाई आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे अशी माहिती कुलदीप करपे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

---

### जिल्हा रुग्णालयातील कथित हलगर्जीपणा प्रकरणी

# डॉ. सतिशकुमार सोळंके यांच्या निलंबनाची मागणी

दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करा,सोमवारी आंदोलनाचा डॉ. गणेश ढवळे यांचा इशारा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात प्रसुतीदरम्यान कथित हलगर्जीपणाच्या घटना घडत असून, संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. दोषींना पाठबळ देत असल्याचा आरोप करत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके यांना निलंबित करण्याची मागणीही त्यांनी केली.



सुमारे २४ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या माता व बाल रुग्णालयात उपचारादरम्यान महिलांच्या मृत्यू व गंभीर प्रकृतीच्या घटना घडत असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला. शेख मुस्कान यांच्या प्रसुतीदरम्यान झालेल्या मृत्यूनंतर वडवणी येथील १९ वर्षीय संध्या सुरज गायकवाड यांच्यावर सिझेरियननंतर पोटात वैद्यकीय हातमोजे व सर्जिकल कापड राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. संसर्ग झाल्यानंतर त्यांच्यावर पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

यापूर्वी छाया गणेश पांचाळ व मुस्कान शेख यांच्या मृत्यूच्या घटनांचीही चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. सर्व प्रकरणांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच वैद्यकीय परवान्याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी डॉ. गणेश ढवळे यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार व आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदन दिले असून, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

---

# अंबडच्या वीज उपकेंद्रात वाढदिवसाचा जल्लोष चिमुकल्याच्या जीवाशी खेळ

### उच्चदाब विद्युत परिसरात खासगी कार्यक्रमाचा आरोप महावितरणच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

अंबड ।प्रतिनिधी

महावितरणच्या अंबड येथील ३३/११ के.व्ही.उपकेंद्रात उच्चदाब विद्युत उपकरणांच्या धोकादायक परिसरात खासगी वाढदिवसाचा कार्यक्रम झाल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने खळबळ उडाली आहे.धक्कादायक बाब म्हणजे या कार्यक्रमाच्या छायाचित्रात महावितरणचे कर्मचारी व जनमित्रांसोबत एक चिमुकले मूलही दिसत असल्याने सुरक्षा नियम नेमके कुणासाठी? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

उच्चदाब वीजवाहिन्या विद्युत उपकरणे आणि जीवघेण्या विद्युत प्रवाहाचा धोका असलेल्या उपकेंद्रात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश देण्याची परवानगी आहे का? खासगी वाढदिवसासाठी सरकारी वीज उपकेंद्राचा परिसर वापरण्याची मुभा कोणी दिली? आणि सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे चिमुकल्याला अशा संवेदनशील परिसरात नेण्यास परवानगी कुणी दिली? या प्रश्नांची उत्तरे आता महावितरण प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

या प्रकरणी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांकडे लेखी तक्रार करण्यात आली असून, वरिष्ठ तंत्रज्ञ गजानन मच्छिंद्र गोदे यांच्यासह संबंधित जनमित्र अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.दुर्घटना घडली नाही म्हणून निष्काळजीपणा माफ होणार का?



वीज उपकेंद्रातील उच्चदाब परिसर हा सर्वसामान्य नागरिकांसाठी धोकादायक असतो.अशा ठिकाणी सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन अपेक्षित असताना खासगी कार्यक्रम झाल्याचा आरोप समोर येणे हेच महावितरणच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

कार्यक्रमादरम्यान चिमुकले मूल परिसरात उपस्थित असल्याचे छायाचित्रातून दिसत असल्याने हा प्रकार अधिक गंभीर बनला आहे. सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही म्हणून संभाव्य धोका दुर्लक्षित करता येणार नाही. उद्या एखादी जीवघेणी घटना घडली असती तर त्याची जबाबदारी नेमकी कुणाची असती असा सवाल उपस्थित होत आहे.

परवानगी कुणाची?

वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी उपकेंद्राचा परिसर वापरण्यास अधिकृत परवानगी घेण्यात आली होती का? परवानगी असल्यास ती कुणी दिली? कार्यक्रमाच्या वेळी कोण अधिकारी-कर्मचारी ड्युटीवर होते? बाहेरील व्यक्तींना उपकेंद्रात प्रवेश कोणी दिला? आणि लहान मुलाला उच्चदाब परिसरात प्रवेश देताना कोणते सुरक्षा प्रोटोकॉल पाळण्यात आले? या प्रश्नांची उत्तरे चौकशीतून समोर येणे गरजेचे आहे.तक्रारीत वरिष्ठ तंत्रज्ञ गजानन मच्छिंद्र गोदे यांच्यासह छायाचित्रात दिसणाऱ्या संबंधित व्यक्तींची भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या आयोजनास अथवा प्रवेशास कुणी परवानगी किंवा सहकार्य केले असल्यास त्याचीही जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.सीसीटीव्ही आणि नोंदी तपासा सत्य बाहेर काढा

घटनेची सत्यता पडताळण्यासाठी उपकेंद्रातील सीसीटीव्ही फुटेज, ड्युटी रजिस्टर, लॉगबुक आणि व्हिजिटर रजिस्टर तातडीने सुरक्षित ठेवून चौकशीदरम्यान तपासण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

या नोंदींच्या तपासणीत कार्यक्रमाच्या वेळी उपकेंद्रात कोण उपस्थित होते बाहेरील व्यक्तींना प्रवेश कसा मिळाला कोणत्या कर्मचाऱ्यांची ड्युटी होती आणि कार्यक्रमास अधिकृत परवानगी होती की नाही याचा उलगडा होऊ शकतो.महावितरण धोका टाळणार की दुर्घटनेची वाट पाहणार वीज उपकेंद्र म्हणजे वाढदिवस किंवा अन्य खासगी कार्यक्रम करण्याचे ठिकाण नव्हे. उच्चदाब विद्युत उपकरणांच्या सान्निध्यात क्षणाची चूकही जीवावर बेतू शकते. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ एका खासगी कार्यक्रमाचा विषय म्हणून न पाहता सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहायची का? चिमुकल्याचा जीव धोक्यात आला असता तर जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कागदी चौकशीपुरते मर्यादित न राहता घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती तपासावी उपलब्ध सीसीटीव्ही व अधिकृत नोंदींची पडताळणी करावी आणि दोष आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान चौकशीत आरोप तथ्यहीन ठरल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची बाजूही स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर शिस्तभंगात्मक कारवाई करावी अशी मागणी तक्रारदारांकडून करण्यात आली

---

# नागरिक एकत्र आले, अन् बोअरवेल धडधडली!

### केजच्या वकीलवाडीतील रहिवाशांचा आदर्श ; वर्गणी जमा करून मिटवला पाणीप्रश्न

केज/प्रतिनिधी

प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवत बसण्यापेक्षा आपले प्रश्न आपणच सोडवू या जिद्दीने केज शहरातील वार्ड क्रमांक चार मध्ये वकीलवाडी तील नागरिकांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.जुना सरकारी दवाखान्यामागील वार्ड क्रमांक चार मधील नादुरुस्त बोअरवेल स्थानिक रहिवाशांनी स्वतः वर्गणी जमा करून दुरुस्त केले आणि परिसरातील पाण्याचा गंभीर प्रश्न तात्काळ मार्गी लावला.

प्रशासनाच्या मदती शिवाय काढला तोडगा

वकीलवाडी परिसरा तील ही बोअरवेल गेल्या काही दिवसां पासून तांत्रिक बिघाडा मुळे बंद पडली होती. त्यामुळे भर पावसाळ्यातही नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. प्रशासनाकडून दुरुस्ती कधी होईल याची वाट न पाहता वार्डातील सजग नागरिकांनी स्वयंप्रेरणेने एकत्र येत स्वतःच्या खर्चाने बोअरवेल दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला.

या कार्यकर्त्यांनी घेतला पुढाकार

या उपक्रमात वार्डा तील बंडू तात्या कदम, संजय जोशी,शहाजी गोकुळराव देशमुख, मनोज बापू मुळे,ड. रघुराज वरपे,धनंजय देवा जोशी,अमर मुळीक,संकेत देशमुख आणि



विकास महादेव चौरे यांनी पुढाकार घेतला.त्यांनी आपापसात वर्गणी गोळा करून दुरुस्तीचे काम पूर्ण केले आणि बंद पडलेली बोअरवेल पुन्हा पूर्ववत सुरू केली.

पुर्वीही तीन- चार वेळा स्वखर्चाने दुरुस्ती

विशेष म्हणजे या भागातील नागरिकांनी यापूर्वीही तीन ते चार वेळा स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून ही बोअरवेल दुरुस्त केली आहे. नागरिकांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे व सामाजिक भान जपल्याबद्दल वकील वाडी परिसरासह संपूर्ण केज शहरातून या सर्व कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).




माजलगाव - फोटो कॅप्शन : कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या आश्वासनानंतर पीक विम्याच्या मागणीसाठी उपोषण करणारे विशाल विष्णु जाधव यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून आपले उपोषण तात्पुरते स्थगित केले.

# घंटागाडी बनली शोभेची वस्तू, पाच महिन्यांपासून एकाच जागी

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतीने १५व्या वित्त आयोगातून ३ लाख ७० हजार रुपये खर्चून 'स्वच्छ तलवाडा, सुंदर तलवाडा'च्या उद्देशाने घंटागाडी खरेदी केली. मात्र, ही गाडी गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून एकाच जागी उभी असल्याने गावातील गल्लीबोळात कचऱ्याचे ढीग साचले असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

घंटागाडीची प्रत्यक्ष किंमत कमी असताना अधिक रक्कम दाखविल्याची चर्चा गावात सुरू असून, १५व्या वित्त




तलवाड्यात गल्लीबोळात कचऱ्याचे ढीग, ग्रामपंचायतीच्या कारभारावर नागरिकांचे प्रश्नचिन्ह..?

आयोगाच्या निधीच्या वापराबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अनेक विकासकामांची इस्टिमेट व मोजमाप पुस्तिका उपलब्ध नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

गावात स्वच्छता, पाणी, वीज व आरोग्यासारख्या मूलभूत सुविधांबाबत नागरिकांच्या तक्रारी असताना स्वच्छतेसाठी खरेदी केलेली घंटागाडी बंद ठेवणे हा ग्रामपंचायतीच्या कारभाराचा नमुना असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. घंटागाडी तातडीने सुरू करून गावातील कचरा नियमित उचलावा,

# धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवात ह.भ.प. सोपान महाराज सानप यांची कीर्तनसेवा



वडवणी ।प्रतिनिधी

धुनकवाड येथील ग्रामदैवत श्रीक्षेत्र धुनकेश्वर देवस्थान येथे मागील दहा वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवाचे आयोजन यंदाही भक्तिमय वातावरणात करण्यात आले आहे. दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत ह.भ.प. सोपान महाराज सानप शास्त्री यांची कीर्तनसेवा होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाला ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके यांची प्रेरणा लाभत असून मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य नामदेव महाराज आघाव व गायनाचार्य सोपान महाराज चव्हाण यांचीही सेवा लाभणार आहे.

महाप्रसादाचे यजमान केशव इंद्रशेन मुंडे, अच्युत त्रिंबक कागणे, शिवाजी काशिनाथ यादव, जगदिश बंकटी गोरे, शिवाजी रामा गावडे, सुंदर साहेबराव भोसले, गोवर्धन अरुण यादव, बालासाहेब रामा काळे, राम दशरथ यादव, विजय आंबादास खैरमोडे, दत्ता विष्णु यादव, नितिन बाबु जावळे, नवनाथ प्रभाकर गावडे, अनिल शंभु काजळे, अशोक बाबासाहेब भोसले, राजेभाऊ आंबादास खैरमोडे, कचरु रावसाहेब गावडे, महादेव सटवा कागणे, दिनकर सदाशिव मुंडे, बालासाहेब यशवंत देशमाने, वसंत बळीराम यादव, सुदाम रावसाहेब गावडे, रामेश्वर ईराप्पा यादव, नारायण आप्पाराव यादव, श्रीकिसन सोपान कागणे, बारिकराव धोंडीबा बिल्पे, गोरखनाथ सदाशिव बोडके, ज्ञानेश्वर गंगाधर राऊत, राम बबन धरपडे, मच्छिंद्र गोविंदराव गावडे, शंकर सटवा काजळे, दत्ता अर्जुन अंडील, बापु महादेव रोटे, हनुमान नवनाथ गायके, मुंजाबा अर्जुन यादव, प्रशांत श्रावण खैरमोडे, सुनील नामदेव बांगर, सोमनाथ पांडुरंग यादव, नारायण विठ्ठल डोंगरे, श्रीरंग पांडुरंग भोसले, गौतम सुदाम डोंगरे, शाहू सुदाम डोंगरे, महादेव रामकिसन डोंगरे, बाबासाहेब लिंबराज राऊत, गोरख दत्तात्रय शेळके, कोंडीराम सुदाम डोंगरे, विष्णु सखाराम यादव, सुग्रीव अर्जुन रुपनर, सुभाष तात्याराम खेलबुडे, बालासाहेब सुदाम धेंडुळे, राधाकिसन बाबुराव कांढुरे यांच्यासह धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समिती व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समिती व ग्रामस्थांनी केले आहे.

# भाजपा किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ॲड. दिलीप करपे यांची निवड

मुंडे साहेबांपासून पक्षाशी जोडलेल्या कार्यकर्त्याला पंकजाताई मुंडेंनी दिली संधी

बीड ।प्रतिनिधी

भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी केज तालुक्यातील जवळबन येथील शेतीनिष्ठ शेतकरी ड. दिलीप करपे यांची निवड करण्यात आली आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारामुळे त्यांना प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे.

किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली. त्यात ड. करपे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

व्यवसायाने वकील असलेले ड. करपे यांना शेतीची विशेष



आवड असून, त्यांनी अंबाजोगाई येथे सेंद्रिय शेती उत्पादन विक्रीचे दुकान सुरू केले आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या काळापासून ते भाजप संघटनेशी जोडलेले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल ड. करपे यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले.

# पूर्णेत चोरट्यांचा धुमाकूळ, एकाच रात्री चार दुकाने फोडली..!

## सराफ दुकानातून लाखोंचा ऐवज लंपास,२० दिवसांत सात-आठ चोरीच्या घटनांनी नागरिकांत संताप

पूर्णा ।प्रतिनिधी

पूर्णा शहर व परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, गेल्या २० दिवसांत सात-आठ ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. बुधवारी, दि. १९ ऑगस्टच्या मध्यरात्री चोरट्यांनी शहरातील महाराष्ट्र बँकेलगतच्या बाजारपेठेत तीन ग्राहक सेवा केंद्रांसह एका सराफ दुकानाला लक्ष्य केले, तर आणखी एका सराफ दुकानात चोरीचा प्रयत्न केला.

संत कृपा ज्वेलर्सचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे अंदाजे चार लाख रुपयांचे दागिने, तर शिवा मल्टी सर्व्हिसेस, पलसिद्ध ग्राहक सेवा केंद्र व कनिष्क ग्राहक सेवा केंद्र येथून सुमारे १० ते १५ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची प्राथमिक माहिती आहे. न्यू आराध्या ज्वेलर्सचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न करण्यात आला. सीसीटीव्हीमध्ये संशयित हालचाली कैद झाल्याची माहिती असून, पूर्णा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

दरम्यान, सिद्धार्थनगर येथील घरफोडीत



सुमारे साडेपाच लाखांचा ऐवज, पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारासमोरील परिसरात सव्वा लाखांची रोकड आणि कानडखेड येथे दोन घरांतून ३० ते ३५ हजारांचा ऐवज चोरीला गेला होता. त्यामुळे रात्रगस्तीचे दावे फोल ठरल्याचा आरोप नागरिक व व्यापाऱ्यांकडून केला जात आहे.

चोरट्यांची 'बॅटिंग', पोलिसांची 'फिल्डिंग' कुठे ?

सततच्या चोरीच्या घटनांमुळे स्थानिक पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे यांच्या कार्यक्षमतेवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित होत आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांनी या घटनांची गंभीर दखल घेऊन तपासाची समीक्षा करावी, रात्रगस्त प्रभावी करावी व चोरट्यांना तातडीने जेरबंद करण्यासाठी विशेष पथक नियुक्त करावे, अशी मागणी व्यापारी व नागरिकांतून होत आहे.

# विविध शेतकरी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा - सुभाष साळवे

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), बीडच्या वतीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवरील प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कन्हेरी (जि. कोल्हापूर) येथे नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचे तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, सेंद्रिय निविष्ठा, कीड-रोग व्यवस्थापन, बीजप्रक्रिया, प्रमाणीकरण, एफपीओ व पशुधनाचे महत्त्व आदी विषयांवर मार्गदर्शन मिळणार आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी (पुणे) येथे १ ते ३ सप्टेंबर २०२६ दरम्यान ५० शेतकऱ्यांसाठी आधुनिक ऊस उत्पादनाचे निवासी प्रशिक्षण होणार आहे. तसेच राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, आनंद (गुजरात) येथे दूध उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, विक्री व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक सूचनेनुसार प्रवास, निवास, भोजन व प्रशिक्षण शुल्काची व्यवस्था आत्मा, बीडमार्फत करण्यात येणार आहे. प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार असून, शेतकऱ्यांनी आधारकार्ड, ७/१२, ८-अ उतारा, फार्मर आयडी, बँक पासबुक प्रत व जात प्रमाणपत्रासह तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील आत्मा शाखेतील बीटीएम/एटीएम यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणाचा तसेच आवश्यकतेनुसार अभ्यासदौऱ्यांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक (आत्मा) बीड सुभाष साळवे यांनी केले आहे.

# शिवमहापुराणाच्या भक्तीरसात न्हाऊन निघणार वडवणी नगरी

## रेणुकामाता संस्थानात सलग तिसऱ्या वर्षी आयोजन,शालिग्राम महाराज मते यांच्या वाणीतून निरुपण

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी शहरातील चिंचवण रोडवरील श्री रेणुकामाता संस्थान येथे २४ ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान सलग तिसऱ्या वर्षी शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत ह.भ.प. शालिग्राम महाराज मते यांच्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरुपण होणार आहे.

कथेस ह.भ.प. माऊली महाराज घुमरे यांची सिंध वाद्याची, तर ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे यांची तबला वादनाची साथ लाभणार आहे. २९ ऑगस्ट रोजी महारुद्राभिषेक, तर ३० ऑगस्ट रोजी श्री दत्तात्रेय मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून, ३१ ऑगस्ट रोजी महाप्रसादाने कथा सप्ताहाची सांगता होईल.

सलग तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या धार्मिक उपक्रमाला



भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिवमहापुराणाच्या माध्यमातून भक्ती, संस्कार, सदाचार व जीवनमूल्यांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे.

वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता-भगिनी, शिवभक्त व भाविकांनी कथा, महारुद्राभिषेक, प्राणप्रतिष्ठा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त वडवणी पंचक्रोशीतील भाविकगण व रेणुकामाता संस्थानचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.

स्थळ : श्री रेणुकामाता संस्थान, चिंचवण रोड, वडवणी, जि. बीड.

# मोफत मधुमेह तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, ११० नागरिकांची तपासणी

कोकण / दिपक कारकर

लायन्स क्लब सावर्डे, आयडियल यांच्या वतीने दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी वहाळ, ता. चिपळूण येथील डॉ. अजित गावकर यांच्या श्री गणेश क्लिनिकमध्ये मोफत मधुमेह तपासणी व उपचार शिबिर घेण्यात आले. शिबिरात ११० नागरिकांनी सहभाग घेतला असून, ५० जुने तर १५ नवीन मधुमेह रुग्णांचे निदान झाले.

शिबिरास डॉ. मृणाल भुवड (एमडी, डीएनबी), डॉ. लायन अजित गावकर व डॉ. लायन स्वाती गावकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. मृणाल भुवड यांचा भेटवस्तू व वृक्षरोपटे देऊन सन्मान करण्यात आला. 'सेवा हीच खरी मानवता, आरोग्य हीच खरी संपत्ती' या भावनेतून आयोजित उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.





मुंबई - जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त समता संघर्ष विचारमंचच्या वतीने ज्येष्ठ सिनेफोटोग्राफर व उत्कृष्ट छायाचित्रकार बाबासाहेब लोंढे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी समता संघर्ष विचारमंचचे अध्यक्ष गणेश सवने, सुरेश सावंत, अतुल बागुल, अजय देठे, राजेंद्र पाटील, राजगुरू, डी.के., विशाल निरभवने, नरसिमुलु गुरम, धर्मेश निकम, अनिल भंडारे आदी उपस्थित होते.( छायाचित्र : रमाकांत मुंडे, मुंबई )

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात वैज्ञानिक दृष्टिकोन दिन साजरा

केज ।प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ, सारणी सांगवी, ता. केज, जि. बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त वैज्ञानिक दृष्टिकोन दिन साजरा करण्यात आला.

यावेळी विवेक वाहिनी व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यवाहक डॉ. सविता शेटे तसेच शाखा कार्याध्यक्ष श्री. विजय घेवारे सर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार होत्या.

डॉ. सविता शेटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करणे का आवश्यक आहे, तसेच प्रत्येक घटनेमागील कारण शोधण्याची सवय कशी लावावी, याबाबत मार्गदर्शन केले. विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमास श्री.




गदळे सर, श्रीमती पव्हणे मॅडम, श्रीमती डोंगरे मॅडम, श्रीमती मुंडे मॅडम, श्रीमती गाडे मॅडम, श्रीमती शेळके मॅडम, श्री. तांदळे सर व श्री. ठोकरे सर यांनी सहकार्य केले.

# प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर व प्रा. रवींद्र सोनोने यांचा सेवापूर्ती गौरव

लातूर ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समिती, लातूरच्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव सूर्यपितांबर निवृत्ती शिंदे, परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. ओमप्रकाश सोनाबाई विठ्ठलराव शहापूरकर आणि महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखा समन्वयक प्रा. रवींद्र नर्मदा मानाजी सोनोने यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी समाजकार्य विभागातून सेवानिवृत्त झालेले बालाजी डावकरे यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय वाघमारे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. पी.एन. सगर, कॅप्टन प्रा. डॉ. बाळासाहेब गोडबोले उपस्थित होते. प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविकात डॉ. संजय गवई यांनी समितीच्या सामाजिक, सांस्कृतिक व समाजप्रबोधनपर कार्याची माहिती देत सेवापूर्ती गौरवाचा उद्देश स्पष्ट केला. सत्काराला उत्तर देताना प्रा. रवींद्र सोनोने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे शिक्षणाला मिळालेल्या प्रेरणेचा उल्लेख केला. प्रा. डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांनी शैक्षणिक ज्ञानदानासोबत राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व राष्ट्रभक्ती रुजविल्याचे सांगितले. प्रा. सदाशिव शिंदे यांनी आई-वडिलांच्या संस्कारांमुळे विद्यार्थ्यांची निःस्वार्थ सेवा करता आल्याचे नमूद केले.




अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांनी सेवानिवृत्तीनंतरही समाजप्रबोधनाचे कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी नागोराव कांबळे, प्रा. एस.एस. स्वामी, प्रा. कल्याण कांबळे, प्राचार्य डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी, ॲड. सुरेश सलगरे, प्रा. संगमेश्वर पानगावे, विनायक बोरीकर, प्रा. प्रशांत उघाडे, डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रशांत उघाडे यांनी केले, तर आभार डॉ. सदाशिव दंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अवलोकित उघाडे, सुमेध गायकवाड, सुमित भडके व बालाजी डावकरे यांनी परिश्रम घेतले. सत्कारमूर्तींचे कुटुंबीय व समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणासाठी एकनाथ चव्हाण यांचे आमरण उपोषण

## सातव्या दिवशी प्रकृती खालावली २१ ऑगस्टला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

परतूर पिराजी गायकवाड

हैदराबाद गॅझेटच्या आधारे बंजारा समाजाला अनुसूचित जमाती एसटी आरक्षणाचा लाभ मिळावा या प्रमुख मागणीसाठी एकनाथ चव्हाण यांनी जालना-अंबड चौफुली येथे १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. गुरुवारी उपोषणाचा सातवा दिवस असून सातत्याने उपोषण केल्याने चव्हाण यांची प्रकृती खालावल्याची माहिती आंदोलनस्थळावरून देण्यात आली.मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही

उपोषणस्थळी बोलताना एकनाथ चव्हाण यांनी माझा जीव गेला तरी चालेल मात्र मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही असा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेमुळे आंदोलनस्थळी उपस्थित बंजारा समाजबांधवांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हैदराबाद गॅझेटचा आधार शासनाकडे तातडीच्या निर्णयाची मागणी




हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाच्या नोंदी असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे. या नोंदींच्या आधारे बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा अशी मागणी करण्यात येत आहे.शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. शासनाच्या कथित दुर्लक्षामुळे बंजारा समाजावर अन्याय होत असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला.२१ ऑगस्टला शक्तिप्रदर्शनाचे आवाहन

दरम्यान आंदोलनाच्या पुढील टप्प्यात २१ ऑगस्ट रोजी जालना-अंबड चौफुली येथे बंजारा समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. या दिवशी मोठ्या संख्येने समाजबांधव एकत्र येऊन आंदोलनाला पाठिंबा देणार असल्याचे सांगण्यात येत आहे.एकनाथ चव्हाण यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी आणि बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर सकारात्मक तोडगा काढावा अशी मागणी जोर धरत आहे. त्यामुळे २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अंबडच्या जुन्या पोलिस ठाण्यात स्वतंत्र बीट चौकी सुरु करा

## पोलिस अधीक्षकांकडे निवेदन नागरिकांची गैरसोय दूर करण्याची विष्णू सोनवणे यांची मागणी

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील जुन्या पोलिस ठाण्याची इमारत सध्या वापराविना पडून असल्याने या इमारतीचा नागरिकांच्या हितासाठी उपयोग करून घेण्याची मागणी पुढे आली आहे. जुन्या पोलिस ठाण्याच्या इमारतीत स्वतंत्र अंबड बीट चौकी सुरू करून त्या ठिकाणी नियमित पोलिस कर्मचाऱ्यांची उपस्थिती ठेवावी अशी मागणी विष्णू बबनराव सोनवणे यांनी पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अंबड पोलिस ठाण्याच्या नवीन इमारतीचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले असून अत्याधुनिक सुविधांमुळे पोलिस प्रशासनाच्या कामकाजाला अधिक गती मिळण्यास मदत होत आहे. मात्र जुन्या पोलिस ठाण्याची इमारत सध्या वापराविना पडून आहे. त्यामुळे या इमारतीचा योग्य उपयोग करून त्या ठिकाणी स्वतंत्र बीट चौकी सुरू केल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो असा मुद्दा निवेदनातून मांडण्यात आला आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी बीट चौकीची गरज

जुनी पोलिस ठाण्याची इमारत



शहराच्या मध्यवर्ती व मुख्य लोकवस्तीच्या परिसरात आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पोलिस प्रशासनाशी संपर्क साधण्यासाठी हे ठिकाण अधिक सोयीचे ठरू शकते. संबंधित परिसर संवेदनशील असल्याने येथे पोलिसांची कायमस्वरूपी उपस्थिती असणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महिला,व्यापारी व नागरिकांना तातडीची मदत

स्वतंत्र बीट चौकी सुरू झाल्यास परिसरात नियमित पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल. त्यामुळे नागरिक, व्यापारी तसेच महिलांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने पोलिसांची मदत मिळण्यास हातभार लागेल. परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासही मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

शासकीय मालमत्तेचा योग्य वापर करण्याची मागणी

जुनी पोलिस ठाण्याची इमारत सध्या धूळ खात पडून आहे. या शासकीय इमारतीचा योग्य वापर केल्यास शासनाच्या मालमत्तेचे जतन होण्याबरोबरच पोलिस प्रशासनाची नागरिकांशी असलेली संपर्कव्यवस्थाही अधिक मजबूत होईल. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून जुन्या पोलिस ठाण्यात स्वतंत्र अंबड बीट चौकी सुरू करण्यास मंजुरी द्यावी अशी मागणी विष्णू बबनराव सोनवणे यांनी केली आहे.

# उंद्री प.दे. येथे २८२ घरकुल लाभार्थ्यांच्या यादीला ग्रामसभेची अंतिम मंजुरी

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे.) येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २८२ लाभार्थ्यांच्या यादीला १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत सर्वानुमते अंतिम मंजुरी देण्यात आली. यामध्ये १४५ सेल्फ सर्व्हे व १३७ असिस्टेड सर्व्हे लाभार्थ्यांचा समावेश आहे.

ग्रामसभेत यादीचे वाचन करून सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंजुरी देण्यात आली. मंजूर यादी पुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी पंचायत समितीकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी सौ. कोणेरी मॅडम यांनी दिली.

घरकुलापासून वंचित असलेल्या पात्र कुटुंबांची स्वतंत्र यादी तयार करून तीही पंचायत समितीकडे सादर करण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. यामुळे घरकुलाच्या प्रतीक्षेत असलेल्या लाभार्थ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

ग्रामसभेत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी सदस्य, पोलीस पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक, तलाठी, कृषी सहाय्यक, आरोग्य कर्मचारी व अंगणवाडी सेविका यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शरदचंद्र पवार महाविद्यालयात सद्भावना दिन उत्साहात

## राष्ट्रीय एकता अखंडता व बंधुभावाची विद्यार्थ्यांनी घेतली सामूहिक शपथ राजीव गांधींना अभिवादन

भोकरदन इसरारखान पठाण

भोकरदन येथील रायबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयात माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापकांनी राष्ट्रीय एकता अखंडता शांतता आणि बंधुभाव जपण्याची सामूहिक शपथ घेतली.कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी जात धर्म,भाषा,प्रांत व प्रदेशाच्या आधारावर भेदभाव न करता सर्व भारतीयांमध्ये भावनिक ऐक्य व सद्भावना वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतली. तसेच हिंसाचाराचा अवलंब न करता शांतता सामाजिक सलोखा राष्ट्रीय एकता व अखंडता टिकविण्याचा संकल्प करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. उमेश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आजच्या काळात सद्भावना व राष्ट्रीय एकतेची गरज अधिक आहे.तरुणांनी सोशल मीडियावरील अफवा व चुकीच्या माहितीपासून सावध राहून देशाची एकता आणि सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी प्रा.उमेश घोडके यांनी सद्भावना दिनाचा इतिहास तसेच राजीव गांधी यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमास प्रा. स्वप्निल बनकर, प्रा. सोमनाथ जाधव, प्रा. किशोर दांडगे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकवृंद व एनएसएस स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन रायबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाच्या वतीने करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. उमेश घोडके यांनी केले.




# 'कठोर परिश्रम, नम्रता आणि शिस्त ही यशाची गुरुकिल्ली' - डॉ. के. राजकुमार

## श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयात 'दीक्षारंभ' कार्यक्रम उत्साहात

पूर्णा ।प्रतिनिधी

श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ' कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. के. राजकुमार यांनी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध कौशल्यविकासाच्या संधींचा लाभ घेऊन कठोर परिश्रम, नम्रता व शिस्त अंगीकारावी, असे आवाहन केले.

प्रा. डॉ. संजय दळवी यांनी विद्यार्थी कल्याण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, करिअर मार्गदर्शन व नियुक्ती कक्ष, सांस्कृतिक विभाग आदींची माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. जितेंद्र पुल्ले यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मार्गदर्शन केले. डॉ. प्रकाश भांगे यांनी नियमित




उपस्थितीचे महत्त्व, तर डॉ. अल्का कौसडीकार यांनी महिला तक्रार निवारण समितीची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय पवार यांनी तर आभार डॉ. वृषाली आंबटकर यांनी मानले. यावेळी डॉ. शिवसांब कापसे, डॉ. संतोष चांडोळे, डॉ. राजीव यशवंते, डॉ. सोमनाथ गुंजकर, डॉ. अंबिका चोंडे, डॉ. वर्षा धुतमल, प्रा. नसीर शेख, डॉ. शिंदे, मंचक वळसे व कालिदास वैद्य उपस्थित होते.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गुरु डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, कार्याध्यक्ष प्रमोद एकलारे, सचिव श्री अमृतराज कदम, सहसचिव गोविंद कदम व कोषाध्यक्ष उत्तमराव कदम यांनी संयोजन समितीचे अभिनंदन केले.



रोहिलागड ।प्रतिनिधी

रोहिलागड येथील जांबुवंत विद्यालयात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शालेय गणवेश,बूट,स्कूल बॅग, पाण्याची बाटली कंपास पेटी आदी साहित्य देण्यात येत आहे.या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात उपलब्ध असलेल्या काही शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिक गोविंददादा वैद्य, नारायणराव टकले,संदीप वैद्य, सुरेश जाधव आणि विशाल वैद्य यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्याची निवड खरेदी तसेच वितरण कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक सोनवणे सर आणि सुनील मोर सर यांनी केले. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.कार्यक्रमास विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकजुटीच्या भावनेत रंगला आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनचा जागतिक छायाचित्रकार दिन



आष्टी (एस.राजेंद्र लाड)

जागतिक छायाचित्रकार दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने कडा येथे आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम फोटोग्राफर बांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आनंददायी, उत्साहपूर्ण आणि अविस्मरणीय ठरला. आष्टी, कडा, धानोरा, धामणगाव तसेच परिसरातील छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॅमेऱ्याच्या प्रतिकृतीचे शार्प इमेजिंगचे संचालक मनोज झंवर, ध्रुव डिजिटल लॅबचे संचालक सुनील भोईटे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करून जागतिक छायाचित्रकार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी दीपक गोरदे व मजहर पठाण यांनी कॅमेऱ्याच्या विविध बाबी, त्यातील तांत्रिक वैशिष्ट्ये आणि फोटोग्राफी क्षेत्रातील बदल याबाबत उपस्थित छायाचित्रकारांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच मनोज झंवर यांनी आगामी काळात फोटोग्राफी व्यवसायासमोर निर्माण होणारी आव्हाने, वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, डिजिटल युगातील बदल आणि व्यवसायातील भविष्यातील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

फोटोग्राफी क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या तांत्रिक बदलांचा स्वीकार करून नव्या संधींचा शोध घेणे, ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा समजून घेणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे आवश्यक असल्याचे यावेळी मार्गदर्शनातून अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या माध्यमातून फोटोग्राफर बांधवांमध्ये संवाद, मैत्री, परस्पर सहकार्य आणि व्यावसायिक एकजुटीची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या छायाचित्रकारांनी एकत्र येत आपल्या व्यवसायातील अनुभवांची देवाणघेवाण केली.

फोटोग्राफी हा केवळ उदरनिर्वाहाचा व्यवसाय नसून, लोकांच्या आयुष्यातील आनंदाचे, भावनांचे आणि अनमोल क्षण कायमस्वरूपी जतन करून ठेवण्याची एक सुंदर कला आहे. काळ पुढे सरकत असताना आठवणी जपून ठेवण्याचे महत्त्व अधिक वाढत असून, त्या आठवणींना छायाचित्रांच्या माध्यमातून जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फोटोग्राफर करीत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मेहनत घेणारे सर्व आयोजक, पदाधिकारी, सहकारी छायाचित्रकार मित्र तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहून त्याची शोभा वाढविणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.जागतिक छायाचित्रकार दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून 'एकजूट, सहकार्य आणि बदलत्या तंत्रज्ञानासोबत पुढे जाण्याचा संकल्प' असा सकारात्मक संदेश देण्यात आला.



# माजी कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांचा आष्टीत मॉर्निंग वॉक

## 'गुड मॉर्निंग ग्रुप'सोबत साधला मनमोकळा संवाद

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

राज्याचे माजी कृषी आयुक्त तथा मृद व जलसंधारण विभागाचे माजी सचिव सुनीलदादा चव्हाण यांनी आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर सकाळी मॉर्निंग वॉक करत 'गुड मॉर्निंग ग्रुप'च्या सदस्यांसोबत मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या या अनौपचारिक भेटीमुळे सकाळच्या व्यायामाला सामाजिक संवादाची आणि स्नेहबंधाची जोड मिळाली.

भगवान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नियमितपणे मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या 'गुड मॉर्निंग ग्रुप'च्या सदस्यांची सुनीलदादा चव्हाण यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी ग्रुपच्या सदस्यांसोबत मॉर्निंग वॉक केला. चालताना त्यांनी उपस्थित नागरिक, मान्यवर तसेच ग्रुपच्या सदस्यांशी विविध विषयांवर संवाद साधत आष्टीतील सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनातील विविध बाबींची माहिती जाणून घेतली. यावेळी क्रीडांगणावर सुरू असलेल्या उपक्रमांचीही त्यांनी पाहणी केली.

आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, चालणे आणि शारीरिक तंदुरुस्तीला जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविणे आवश्यक असल्याचे यावेळी सुनीलदादा चव्हाण यांनी उपस्थितांशी संवाद साधताना अधोरेखित केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्यासाठी काही वेळ देणे गरजेचे आहे. मॉर्निंग वॉकसारख्या उपक्रमातून शारीरिक आरोग्यासोबतच नागरिकांमध्ये परस्पर संवाद आणि सामाजिक बांधिलकीही वाढते, असा सूर या संवादातून उमटला.

माजी कृषी आयुक्त तथा माजी सचिव सुनीलदादा चव्हाण यांच्यासारख्या अनुभवी प्रशासकीय अधिकाऱ्याने स्थानिक नागरिकांसोबत अगदी अनौपचारिक पद्धतीने संवाद साधल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांनी नागरिकांशी विविध विषयांवर आपुलकीने चर्चा करत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि स्थानिक घडामोडी जाणून घेतल्या. त्यामुळे ही भेट केवळ मॉर्निंग वॉकपुरती मर्यादित न राहता सामाजिक संवादाचा एक सुखद अनुभव ठरली.

या प्रसंगी राजेंद्र धोंडे, संतोषभैय्या चव्हाण, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी बबनराव खंडागळे, रत्नदीप निकाळजे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रा. रावसाहेब काळे, गलांडे आबा, रमेश धोंडे, मच्छिंद्र जमदाडे, शहादेव नरवडे, विकास कदम, चंद्रकांत कोकरे, जयचंद नेलवडे, गर्जे आदी मान्यवरांसह 'गुड मॉर्निंग ग्रुप'चे सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर मॉर्निंग वॉकनंतर सुनीलदादा चव्हाण यांच्यासमवेत उपस्थितांनी सामूहिक संवाद साधला. या भेटीमुळे 'गुड मॉर्निंग ग्रुप'च्या सदस्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# पत्रकार सुनिल थोरात यांना 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार' जाहीर



माजलगाव ।प्रतिनिधी

पत्रकारिता क्षेत्रासह मातंग समाजाच्या सामाजिक न्यायाच्या चळवळीत उल्लेखनीय योगदान देणारे पत्रकार सुनिल थोरात यांची 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कारासाठी' निवड करण्यात आली आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजक मिलिंद भाऊ मुजमुले यांच्या वतीने २२ ऑगस्ट २०२६ रोजी सिद्धी मंगल कार्यालय, धारूर रोड, भोगलवाडी फाटा, ता. धारूर, जि. बीड येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

पत्रकारितेतून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, वंचित घटकांच्या समस्या मांडणे आणि सामाजिक समता, बंधुता व न्यायाच्या चळवळीला बळ देण्याच्या कार्याची दखल घेत सुनिल थोरात यांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

या सोहळ्यास मा. आ. प्रकाश दादा सोळंके, मा. सचिन भाऊ साठे, मा. डॉ. मिलिंद नाना आवाड, मा. जयसिंग भैय्या सोळंके यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, त्यांच्या हस्ते सुनिल थोरात यांना मानपत्र व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मिलिंद भाऊ मुजमुले यांनी केले आहे.



जातेगाव - युवा नेतृत्व यशराजभैय्या पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई तालुक्यात विविध सामाजिक व विधायक उपक्रम राबविण्यात आले. जातेगाव येथे अविनाश सुधाकरराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात नागरिक, कार्यकर्ते, युवक व समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यशराजभैय्या पंडित यांना शुभेच्छा दिल्या.

# विवेक व विज्ञानवादी समाजनिर्मिती हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय-प्राचार्य एम.बी.सानप

## शहीद डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त घाटशिळा कनिष्ठ महाविद्यालयात वैचारिक मंथन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

समता, बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांबरोबरच अंधश्रद्धा निर्मूलनाचे मौलिक कार्य करणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर हे महान विचारवंत आणि लढवय्ये कार्यकर्ते होते. अंधश्रद्धामुक्त, विज्ञानवादी आणि मानवतावादी समाजरचना निर्माण करणे हेच शिक्षण व्यवस्थेचे अंतिम ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन घाटशिळा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य एम. बी. सानप यांनी केले.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त घाटशिळा कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'अंधश्रद्धा : एक शाप' या विषयावर वैचारिक चर्चा व मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य एम. बी. सानप बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी भाषा विषय शिक्षक महासंघाचे बीड जिल्हा सचिव तथा मराठी विभाग प्रमुख प्रा. बिभिषण चाटे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बी. के. मुंडे, उपक्रमशील शिक्षक परजणे-पाटील यांच्यासह महाविद्यालयातील मान्यवर शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी समाजनिर्मिती या विषयांवर उपस्थित मान्यवरांनी विचार मांडले.

प्राचार्य एम. बी. सानप पुढे म्हणाले की, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. अंधश्रद्धेच्या नावाखाली सर्वसामान्यांची होणारी फसवणूक आणि बुवाबाजीला विरोध करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली. शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, प्रश्न विचारण्याची वृत्ती, विवेकबुद्धी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारे असले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. बिभिषण चाटे यांनी डॉ. दाभोळकर यांच्या अंधश्रद्धाविरोधी चळवळीतील योगदानाचा आढावा घेतला. डॉ. दाभोळकर यांनी अंधश्रद्धा विरोधी कायद्यासाठी सातत्याने संघर्ष केला. १९८९ मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा




निर्मूलन समितीची स्थापना करून कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी या चळवळीला व्यापक स्वरूप दिले. महाराष्ट्रातील जादूटोणा, अघोरी प्रथा आणि विविध प्रकारच्या अंधश्रद्धांविरोधात कायदा व्हावा यासाठी त्यांनी तब्बल १८ वर्षे अविरत संघर्ष केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजात अंधश्रद्धेविरोधात जागृती निर्माण होऊन विवेकवादी विचारांना बळ मिळाले, असे त्यांनी सांगितले.

प्रा. बी. के. मुंडे यांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या पत्रकारिता व समाजप्रबोधनाच्या कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. दाभोळकर यांनी साप्ताहिक 'साधना'चे संपादन करत पुरोगामी विचार आणि सामाजिक प्रबोधनाची भूमिका प्रभावीपणे मांडली. तरुणांमध्ये वैज्ञानिक जाणीव निर्माण करणे, जातिभेद निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी सातत्याने काम केले. समाजातील रूढी-परंपरांकडे चिकित्सक नजरेने पाहण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा त्यांच्या विचारांतून मिळते, असे प्रा. मुंडे यांनी नमूद केले.

श्रीयुत परजणे-पाटील यांनी डॉ. दाभोळकर यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील विवेकवादी चळवळीला मोठी ताकद मिळाल्याचे सांगितले. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात त्यांची दुर्दैवी हत्या झाली; मात्र त्यांच्या विचारांचा प्रवाह त्यानंतरही थांबला नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, समता आणि विवेकनिष्ठ समाजनिर्मितीचा त्यांनी दिलेला संदेश आजच्या पिढीसाठीही तितकाच महत्त्वाचा असून त्यांचे विचार चिरंतन राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वैचारिक मंथनातून विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता आणि विवेकवाद याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळून समाजातील अनिष्ट प्रथा व अंधश्रद्धांविरोधात जागरूकता निर्माण होण्यास मदत होते, असा सूर कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

या वैचारिक मंथन कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मराठी विभागातील विद्यार्थी नागेश खेडकर, प्रसाद टेकाळे, ओंकार कांबळे, दामोदर खेडकर, आदित्य खेडकर यांच्यासह विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी किरण कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राध्यापकांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

# आईच्या ममतेतून साकारले बुद्धविहार मुलाच्या स्मृतीस अनोखी श्रद्धांजली

## ६७ वर्षीय अंध मातेने ५० लाखांची दोन गुंठे जागा समाजाला केली दान ७/१२ व दानपत्र नगर परिषदेकडे सुपूर्द

भोकरदन इसरारखान पठाण

मातृत्वाच्या ममतेला त्यागाची आणि दानशूरपणाची जोड मिळाली की त्यातून समाजासाठी प्रेरणादायी इतिहास घडतो याचा प्रत्यय भोकरदन शहरात आला आहे. फुलेनगर धनगरवाडी येथील रहिवासी तथा सध्या सिल्लोड येथील स्नेहनगर येथे वास्तव्यास असलेल्या ६७ वर्षीय वृद्ध व अंध माता शशिकलाबाई उत्तम जोगदंडे यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाच्या स्मृती जपण्यासाठी तब्बल ५० लाख रुपये किमतीची दोन गुंठे जागा व त्यावरील बुद्धविहार समाजासाठी दान केला आहे. स्वतःचे राहते घर पाडून त्या जागेवर बुद्धविहार उभारण्याचा त्यांचा निर्णय समाजमनाला भावणारा ठरला आहे.मंगळवारी दि.१९ शशिकलाबाई जोगदंडे यांनी भोकरदन नगर परिषद कार्यालयात येऊन मुख्याधिकारी गजानन तायडे आणि लोकनियुक्त नगराध्यक्षा समरीन नाज वसीम बेग मिर्झा यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी दोन गुंठे जागेचा ७/१२ उतारा संबंधित कागदपत्रे तसेच ५०० रुपयांच्या बाँडवर केलेले दानपत्र नगर परिषदेकडे सुपूर्द केले. या वेळी त्यांचे भाऊ प्रा.विजय वाकेकर भाचा अभय वाकेकर आणि नातेवाईक प्रयागबाई आरके उपस्थित होत्या.




मुलाच्या निधनानंतर घेतला धाडसी निर्णय

शशिकलाबाई यांचा एकुलता एक मुलगा दीपक उत्तम जोगदंडे याचा काही वर्षांपूर्वी अपघाती मृत्यू झाला.या दुःखातून सावरत असतानाच त्यांचे पती उत्तम जोगदंडे यांचेही निधन झाले. आयुष्यातील दोन मोठे आधार गमावल्यानंतरही शशिकलाबाई खचल्या नाहीत.उलट मुलाची स्मृती कायमस्वरूपी जिवंत राहावी आणि त्याच्या नावाने समाजाला काहीतरी देता यावे या भावनेतून त्यांनी आपल्या राहत्या घराचे रूपांतर बुद्धविहारात करण्याचा निर्णय घेतला.आज या जागेवर उभारण्यात आलेल्या बुद्धविहाराची आणि जागेची सध्याच्या बाजारभावानुसार किंमत सुमारे ५० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. ही संपूर्ण मालमत्ता त्यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून बौद्ध समाजासाठी उपलब्ध करून दिली आहे.

अंधत्व-वृद्धापकाळावर मात; समाजसेवेचा आदर्श

वृद्धापकाळ आणि अंधत्व यांची पर्वा न करता स्वतःची मौल्यवान मालमत्ता समाजासाठी दान करण्याचे धाडस शशिकलाबाईंनी दाखविले. त्यांच्या या त्यागाची दखल घेत नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी गजानन तायडे, नगराध्यक्षा समरीन मिर्झा आणि नगरसेवक कदिर बापू यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.स्वतःच्या दुःखाला समाजसेवेची दिशा देत एवढे मोठे दान करणे ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

१७ सप्टेंबरला शशिकलाबाईंच्या हस्ते ध्वजारोहण

दरम्यान मुख्याधिकारी गजानन तायडे यांनी यावेळी महत्त्वाची घोषणा केली. आगामी १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त भोकरदन नगर परिषद कार्यालयात होणारे ध्वजारोहण शशिकलाबाई जोगदंडे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे त्यांनी नगराध्यक्षा समरीन मिर्झा यांच्या उपस्थितीत सांगितले.

समाजासाठी आपल्या आयुष्याची आणि संपत्तीची मोठी आहुती देणाऱ्या शशिकलाबाईंचा गौरव म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. विशेष कर्तृत्ववान दानशूर अथवा सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या हस्ते ध्वजारोहण करून त्यांचा गौरव करण्याची परंपरा या माध्यमातून अधोरेखित होणार आहे.

शशिकलाबाई जोगदंडे यांच्या या दानशूरपणाचे तसेच नगर परिषदेच्या निर्णयाचे शहरातून सर्व स्तरांतून स्वागत होत असून त्यांच्या कार्याबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मुलाच्या आठवणीला समाजसेवेची जोड

मुलाच्या निधनानंतर त्याची आठवण केवळ मनात न ठेवता ती समाजोपयोगी कार्यातून जिवंत ठेवण्याचा शशिकलाबाईंचा निर्णय अनेकांसाठी आदर्श ठरला आहे. मुलाच्या स्मृतीसाठी उभारलेला बुद्धविहार हीच माझ्यासाठी खरी श्रद्धांजली या भावनेतून त्यांनी केलेले हे दान मातृत्व त्याग आणि सामाजिक बांधिलकीचे अनोखे उदाहरण ठरले आहे.

# श्री क्षेत्र चाकरवाडीचे लाडके ज्ञानोबा माऊली आनवणे काळाच्या पडद्याआड

माऊली दादा महाराजांची निस्वार्थ सेवा करणारे सेवाभावी व्यक्तिमत्त्व हरपले

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र चाकरवाडी येथील सर्वांचे लाडके, मनमोकळे व स्पष्टवक्ते ज्ञानोबा आनवणे (माऊली) यांचे गुरुवारी सायंकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चाकरवाडीसह भाविक, भक्तगण, मित्रपरिवार व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.



ज्ञानोबा माऊली यांनी माऊली दादा महाराजांची अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने सेवा केली. सेवा हीच भक्ती मानून त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता कार्य केले. भाविकांशी आपुलकीने वागणे, मनमोकळेपणाने संवाद साधणे आणि स्पष्टपणे सत्य बोलणे या स्वभावामुळे ते सर्वांच्या जिव्हाळ्याचे झाले होते.

त्यांच्या निधनाने श्री क्षेत्र चाकरवाडीने एक निस्वार्थ सेवक व प्रेमळ व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. ज्ञानोबा आनवणे (माऊली) यांचा अंत्यविधी आज सकाळी ९ वाजता श्री क्षेत्र चाकरवाडी येथे होणार असून, अंत्यदर्शनासाठी नातेवाईक, मित्रपरिवार व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘ज्याला ‘मी’ कळला तो देव झाला’ –महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथगडकर

## श्री क्षेत्र पोखरी येथे १७ वा अखंड हरिनाम सप्ताह व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) वेदांची वाक्ये आणि संतांचे अभंग हे त्रिकालाबाधित सत्य असतात. चांगल्या विचारांचे संस्कार आणि संतविचारांचे आचरण यातूनच परिपूर्ण माणूस घडतो. ज्याला ‘मी’ कळला तो देव झाला, असे प्रतिपादन गहिनीनाथगडाचे मठाधिपती ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर यांनी केले. श्री क्षेत्र पोखरी, ता. आष्टी येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता दिनी झालेल्या काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते.

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र पोखरी येथे १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत १७ वा भव्य अखंड हरिनाम सप्ताह तसेच विविध धार्मिक कार्यक्रम आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर आणि ह.भ.प. रवींद्र महाराज सुद्रीक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. सप्ताहाचे व्यासपीठ चालक म्हणून मुळेवाडी येथील श्री दत्त योगीराज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे ह.भ.प. तुळशीराम सोले महाराज यांनी जबाबदारी सांभाळली, तर कलशपूजन देवीदासआबा धस यांच्या हस्ते संपन्न झाले.

सप्ताहाच्या संपूर्ण कालावधीत पहाटे काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, नवनाथ ग्रंथ पारायण, हरिपाठ, तसेच रात्री नामवंत महाराजांची कीर्तने, जागर आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांना पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि



भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सप्ताहादरम्यान ह.भ.प. महंत अजिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वरगड), ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज शास्त्री (गणेशगड), ह.भ.प. महंत कैलास महाराज भोरे (देवदैठण), ह.भ.प. महंत जाधव गुरुजी (रामाचे दादेगाव), ह.भ.प. महंत चैतन्य महाराज (जुना गहिनीनाथगड), ह.भ.प. महंत रामकृष्ण रंधवे बापू (पाटोदा) आणि ह.भ.प. रवींद्र महाराज सुद्रीक पाटील (मुळेवाडी) यांच्या ओघवत्या वाणीतील कीर्तनांचा लाभ भाविकांना मिळाला.

सांगता दिनी श्री विठ्ठल-रुक्मिणी, दत्तगुरु, सद्गुरु गहिनीनाथ महाराज, श्री संत वामनभाऊ महाराज आणि संत भगवान बाबा यांच्या मूर्तींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री, ह.भ.प. पोपट महाराज मरकड (एकमुखी दत्त देवस्थान, मढी) आणि आ. सुरेश धस यांच्या शुभहस्ते धार्मिक विधी व मंत्रोच्चारात मूर्तींची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. आपल्या कीर्तनातून त्यांनी संतपरंपरेचे महत्त्व, नामस्मरण, सदाचार, आत्मचिंतन आणि चांगल्या संस्कारांची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. संतांचे विचार केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणले पाहिजेत. संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी कुटुंब आणि समाजाने सकारात्मक विचारांचा वारसा पुढे नेणे आवश्यक आहे, असा संदेश त्यांनी दिला.

या धार्मिक सोहळ्यास सतीषआबा शिंदे, सरपंच सुधीर पठाडे, महेश खाकाळ, अशोक पोकळे, सरपंच परीवंत गायकवाड, पत्रकार उत्तम बोडखे, माजी सरपंच जालिंदर गायकवाड, सरपंच अंगद शिंदे, प्राचार्य अशोक डोके सर यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताहातील विविध धार्मिक कार्यक्रम, संत-महंतांची कीर्तने, मूर्तींची भव्य मिरवणूक आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे श्री क्षेत्र पोखरी परिसरात आठवडाभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शेवटी आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड (जिमाका)

इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील बारावी नंतरच्या बिगरव्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता शासकीय वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाळ स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी या योजनांचे ऑनलाईन वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज र्हीींि://हारी.ारहरळीं.ीस या संकेतस्थळावर दि.३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

बीड नगरपरिषद हद्दीपासून १० किमी अंतरामधील महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच केवळ वसतीगृह योजनेसाठी अर्ज करावा. बीड तालुका वगळता, जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाळ स्वयंम योजनांसाठी अर्ज करावा. बीड तालुका व्यतिरिक्त इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी शासकीय वसतीगृहासाठी अर्ज करू नये. पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीत ऑनलाईन अर्ज भरून या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# पंधरा दिवसांपासून पावसाची पाठ, पिके टाकताहेत माना

### हाता-तोंडाशी आलेला घास हिरावण्याची भीती, शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील जाहूर आणि अंबुलगा बु. महसूल मंडळात गेल्या दहा-बारा दिवसांपासून पावसाने दडी मारली असून कडक उन्हामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांची पेरणी केली; मात्र सध्या सोयाबीन फुलोऱ्यात व शेंगा धरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने ताण दिल्याने पिके कोमेजू लागली आहेत.

जमिनीतील ओलावा कमी होत असल्याने आणखी काही दिवस पाऊस न झाल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. सुरुवातीला अतिपावसाचा फटका आणि आता पावसाने दिलेल्या ताणामुळे ओला की कोरडा दुष्काळ, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.

पावसाअभावी हाता-तोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत असून, प्रशासनाने जाहूर व अंबुलगा बु. महसूल मंडळातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीची नोंद घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# तपश्चर्येचा सुगंध;कड्यात आज रंगणार ११ उपवास तपपूर्ती महोत्सव

### सौ.तृप्ती संजय मेहेर यांच्या तपश्चर्येची आज होणार तपपूर्ती

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) जैन धर्मातील तप, त्याग, संयम आणि आत्मशुद्धीची समृद्ध परंपरा जपणाऱ्या कडा नगरीत आज शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी सौ. तृप्ती संजय मेहेर यांच्या ११ उपवास तपश्चर्येचा तपपूर्ती महोत्सव भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.

प.पू. आचार्य सम्राट श्री आनंद ऋषिजी म.सा. यांच्या कृपाशीर्वादाने, कर्नाटक गजकेशरी प.पू. श्री गणेशलालजी म.सा. यांच्या आशीर्वादाने तसेच प.पू. प्रज्ञाजी म.सा., प.पू. प्राचीश्रीजी म.सा. आणि प.पू. प्रसन्नाजी म.सा. यांच्या पावन सानिध्यात हा मंगल सोहळा संपन्न होणार आहे.

सौ. तृप्ती संजय मेहेर यांनी ११ उपवासांची कठोर तपश्चर्या पूर्ण केली असून, त्यांच्या या साधनेतून जैन धर्मातील संयम, त्याग,



आत्मनिग्रह आणि आध्यात्मिक उन्नतीचे दर्शन घडत आहे. तपश्चर्येची ही साधना केवळ वैयक्तिक धार्मिक आचरण न राहता समाजातील भाविकांसाठीही प्रेरणादायी ठरणारी आहे.

तपपूर्ती महोत्सवानिमित्त आज शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता श्री वर्धमान जैन स्थानक, कडा येथे पचकावणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमानंतर सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत कडा येथील परमेश्वर मंगल कार्यालयात भावा व गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.

तपपूर्तीच्या या मंगल सोहळ्याला जैन समाजातील भाविक तसेच तप, त्याग आणि अध्यात्मावर श्रद्धा असणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. तपस्विनी सौ. तृप्ती संजय मेहेर यांच्या ११ उपवासांच्या तपश्चर्येला शुभेच्छा व आशीर्वाद देऊन या आध्यात्मिक पर्वाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मेहेर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. कडा नगरीत या तपपूर्ती महोत्सवामुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, तपश्चर्या, संयम आणि आत्मशुद्धीचा संदेश देणारा हा सोहळा भाविकांसाठी विशेष आध्यात्मिक पर्व ठरणार आहे.

# कोळी महासंघ मराठवाडा यांच्या वतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीला निवेदन

नांदेड जिल्हा प्रतिनिधा-अनुसूचित जमाती कल्याण समिती नांदेड दौऱ्यावर आली असता आज शासकीय विश्रामगृह नांदेड येथे शंकर मनाळकर यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जमातीचे निवेदन देऊन समिती अध्यक्ष दौलतजी दरोडा व इतर आ.महोदय व तसेच समिती सदस्य यांची भेट घेऊन ,पुराव्या सहित अगदी इंग्रज काळापासून ते आजता- गायक अशा स्वरूपाचे निवेदन छत्रपती संभाजी नगर व किनवट जमात पडताळणी समिती हेतुपुरस्सर महादेव कोळी प्रमाणपत्र अवैध करण्यात येत असल्या बाबत निवेदन देण्यात आले.

मराठवाडा अध्यक्ष कोळी महासंघाचे शंकर मनाळकर यांच्या नेतृत्वाखाली के.एन.जेटेवाड ,सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पुंडलिकराव बोन्डलेवाड,शिवाजी गलांडे, बोईनवाड,राम मालेवाड रुईकर, बालाजी काजलवाड, के.एन. जेटेवाड ,अँड.प्रशान्त जगताप, अँड.जेटेवाड मॅडम, मामीलवाड शंकपाळे ,राजू पिंगळवाड, डीडी बोईनवाड, अनिल मोरे,आनंदा रेजितवाड व बहुसंख्येने जमात बांधव यांनी अध्यक्ष अनुसूचित जमाती कल्याण समिती अध्यक्ष आ. दौलतराव दरोडा हे नांदेड




दौऱ्यावर आले असता यांनी जमातीचे म्हणणे अतिशय लक्षपूर्वक ऐकून घेतले व सन्मानपूर्वक निवेदन स्वीकारले, मराठवाड्यातील कोळी, मल्हार कोळी जमात मराठवायातील दोन्ही कार्यालय येथुन सर्व हेतुपुरस्सर अवैध करीत असल्याबद्दल निवेदन दिले यावेळी जमलेल्या जमात बांधवाकडून समिती अध्यक्ष व त्यांचे सहकारी यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आले.

# महाराष्ट्रात २० ऑगस्टला पाऊस बरसणार ४ जिल्ह्यांना हवामान खात्याचा यलो अलर्ट

प्रतिनिधी @ मुंबई

मुंबई : सध्या राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी असला तरी २० ऑगस्ट रोजी अनेक भागांत पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील ४ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

कोकणातील पालघरमध्ये आणि मुंबईत हलका पाऊस, तर ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्गातही मध्यम पावसाचा अंदाज असून या सर्व जिल्ह्यांमध्ये अद्याप कोणताही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही. सोबतच उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर नाशिक घाटमाथ्यावर हलका ते मध्यम स्वरूपाच्या पाऊस पडेल असा अंदाज आहे. अहिल्यानगर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पावसाचा वेग काहीसा समानच आहे. पुणे, कोल्हापूर आणि सातारा घाटमाथा परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्येही ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. परभणी, बीड आणि नांदेड जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी २० ऑगस्ट रोजी कोणताही इशारा देण्यात आलेला नाही. मात्र ढगाळ वातावरण निर्माण होऊ शकतं अशी शक्यता आहे. एकंदरच, राज्यात सध्यातरी पावसाचा जोर कमी झाला आहे व कोणत्याही प्रकारचे हाय अलर्ट जारी करण्यात आलेले नाहीत.

# राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात नशा मुक्ती केंद्र स्थापन करा!

## मुख्यमंत्र्यांचे निर्देश; ’ड्रग्ज फ्री महाराष्ट्र’साठी सर्व विभाग एकत्रित काम करणार

प्रतिनिधी @ मुंबई

तरुण पिढीला नशेच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी आणि ’ड्रग्ज फ्री महाराष्ट्र’चे ध्येय गाठण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. नशेच्या सेवनानंतर कारवाई करण्यापेक्षा तरुणांना या दुष्टचक्रात ढकलणाऱ्या प्रवृत्तींना मूळापासून नष्ट करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. वर्षा निवासस्थानी पार पडलेल्या ’नशामुक्त महाराष्ट्र धोरण’ सादरीकरण बैठकीत त्यांनी राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात आणि वैद्यकीय महाविद्यालयात नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

नशामुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत स्पष्ट केले. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, तसेच अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या उच्चस्तरीय बैठकीस उपस्थित होते.

तरुणाईला या विळख्यापासून वाचवण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या सुरक्षेवर भर देताना मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर सक्तीने ’टपरीमुक्त’



करण्याचे आदेश दिले आहेत. या नियमात कोणतीही तडजोड चालणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्यांनी कॅम्पस अमली पदार्थमुक्त घोषित करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच शालेय अभ्यासक्रमात अमली पदार्थांच्या दुष्परिणामांचा समावेश करण्यावरही भर दिला गेला आहे.एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची सुनावणी वेळेत व्हावी आणि खटल्यांचा निपटारा जलदगतीने व्हावा, यासाठी राज्यात जलदगती न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोक्ता पॅनलची स्थापना राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.